सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - १८३ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## ३० दिवसांहून अधिक काळ अटक झाल्यास....
## पंतप्रधान,मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना पद सोडावे लागणार

### अमित शाहांनी मांडली तीन विधेयके



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नवी दिल्ली**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत तीन महत्त्वाची विधेयके मांडली. गंभीर गुन्हेगारी आरोपांमध्ये अटक झाल्यास किंवा ताब्यात घेतल्यास पंतप्रधानांपासून ते राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री आणि जम्मू आणि काश्मीरसह केंद्रशासित प्रदेशांच्या मंत्र्यांना पदच्युत करण्याची तरतूद या विधयेकांद्वारे केली आहे. विधेयकातील प्रस्तावित तरतुदींनुसार, जर एखादा मंत्री गंभीर गुन्ह्याच्या (पाच वर्ष किंवा त्याहून अधिक शिक्षेचे गुन्हे) प्रकरणात सलग ३० दिवस तुरुंगात असेल तर राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार त्याला पदावरून काढून टाकू शकतील.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत विधेयके मांडल्यानंतर विरोधकांनी त्यावर आक्षेप घेत गदारोळ केला. एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी आक्षेप घेतल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. या विधेयकाच्या माध्यमातून राज्य सरकारे कमकुवत करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. या विधेयकाच्या माध्यमातून गेस्टापो (सरकारचे गुप्त पोलीस) आणले जाऊ शकतात, असा आरोप ओवैसी यांनी केला.

अमित शाह यांनी आज संविधान (१३० वी दुरूस्ती) विधेयक, जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश सरकार (दुरुस्ती) विधेयके मांडली. ही तीन विधेयके सादर केल्यानंतर ती विचारार्थ संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचाही उल्लेख अमित शाह यांनी केला.

**पंतप्रधानांनी गुन्हा केल्यास**

प्रस्तावित दुरूस्तीनुसार पंतप्रधानपदासाठीही कडक तरतूद करण्यात आली आहे. जर पंतप्रधानांना पदावर असताना पाच वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा असलेल्या गुन्ह्यात सलग तीस दिवस कारावास भोगावा लागला तर त्यांना एकतिसाव्या दिवसापर्यंत राजीनामा द्यावा लागेल. जर त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला नाही तर ३१ व्या दिवसानंतर ते पंतप्रधान म्हणून काम करू शकणार नाहीत.पंतप्रधान किंवा मंत्र्यांची कोठडीतून सुटका झाल्यानंतर राष्ट्रपती संबंधित व्यक्तीला पुन्हा पंतप्रधान किंवा मंत्रिपदावर नियुक्त करू शकतात, असेही विधेयकात नमूद केले असल्याची माहिती मिळत आहे.

## मुंबईच्या धर्तीवर नागपुरात होणार नव शहर
## राज्याला मिळणार विकासाची नवी दिशा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

राज्यातील वाहतूक आणि शहरी विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे अनेक निर्णय मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आले.

आजच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, नागपूरमध्ये विकासाचे नवे दालन उघडले जाणार आहे. शहरात नवीन रिंग रोड उभारणीस मंजुरी देण्यात आली असून, उपराजधानीत एक नवनगर तयार करण्यासही मान्यता देण्यात आली. आज घेण्यात आलेल्या निर्णयाचा राज्यातील पाच मोठी शहरे आणि परिसराला मोठा फायदा होणार आहे. नागपूर, मुंबईसह पुणे-लोणावळा या उपनगरीय रेल्वे मार्गावर तिसरी व चौथी मार्गिका उभारणीस मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे पुणे-लोणावळा कॉरिडॉर अधिक सक्षम होणार असून, त्या परिसरातील औद्योगिक, निवासी व व्यावसायिक विकासाला आवश्यक ती कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. तसेच पुणे शहरातील वाढत्या ट्रॅफिकचा ताण कमी करण्यासही यामुळे मदत होईल. याचबरोबर पुणे मेट्रोच्या टप्पा एकांतर्गत बालाजीनगर-बिबवेवाडी व स्वारगेट- कात्रज या दोन नवीन स्थानकांना मंजुरी मिळाली.

मुंबईत मेट्रो मार्गिका ११ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला आहे. वडाळा डेपो ते गेटवे ऑफ इंडिया या १६ किलोमीटर लांबीच्या पूर्ण भूमिगत मार्गिकेची उभारणी करण्यात येणार आहे. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक व हॉर्निमल सर्कल अशा महत्त्वाच्या ठिकाणांवरून ही मेट्रो धावेल. जवळपास २४ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून, जपानी आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून (जायका) यासाठी निधी उपलब्ध होणार आहे. या मार्गिकेमुळे मुंबईकरांना वाहतुकीत मोठा दिलासा मिळेल. तसेच बेस्टसोबत संयुक्त विकास प्रकल्पांतर्गत व्यावसायिक कॉम्प्लेक्स उभारला जाणार असून, त्यातून बेस्टला अतिरिक्त उत्पन्न मिळणार आहे.

## नथुराम गोडसे होण्याची धमकी देणाऱ्या संग्राम भंडारेंच्या समर्थनासाठी गोपीचंद पडळकर मैदानात

### ते हिंदू धर्माच्या रक्षणासाठी कार्यरत आहेत - पडळकर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०पुणे**

दोन दिवसांपूर्वी कीर्तनकार संग्राम भंडारे यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना उद्देशून आम्हाला नथुराम गोडसे व्हावं लागेल असे वक्तव्य करत थेट धमकीच दिली होती. या वक्तव्यावरून मोठा वाद निर्माण झाला असताना आता भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी संग्राम भंडारे यांच्या पाठीशी उभे राहत ठाम समर्थन दिले आहे.

मालेगावमध्ये बोलताना पडळकर म्हणाले, संग्राम बापू महाराज हे हिंदू धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी परखडपणे भूमिका मांडतात. लव्ह जिहादसारख्या वाढत्या घटनांबाबत ते समाजाला सतत सावध करत आहेत. कीर्तन हा समाजप्रबोधनाचा मार्ग असून त्याद्वारे ते जागृती निर्माण करत आहेत. त्यांच्या या कार्यावर लोकांचा प्रचंड विश्वास आहे. काही लोकांना मात्र त्यांच्या परखड भूमिकेचा राग येतो.

पुढे ते म्हणाले की, संग्राम बापूंनी धर्मरक्षणाची बाजू मांडल्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली आहे. त्यांच्या भूमिकेमुळे अनेकांना सावधगिरीचा इशारा मिळतो, हीच खरी समाजसेवा आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्या ठाम भूमिकेला पूर्ण पाठिंबा देतो.

दरम्यान, संगमनेरमधील घुलेवाडी येथे कीर्तनादरम्यान झालेल्या गोंधळावरही पडळकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कीर्तन हा समाजप्रबोधनाचा पवित्र मार्ग आहे. त्या ठिकाणी गोंधळ घालणे म्हणजे हिंदू संस्कृतीचा अपमान आहे. ज्यांनी गोंधळ घातला त्यांचा मी जाहीर निषेध करतो, असे पडळकर म्हणाले.

## शून्य + शून्य = भोपळा; आशिष शेलारांचा मनसे-उबाठावर घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०पुणे**



बेस्ट निवडणुकीच्या निकालानंतर भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी पुण्यात मध्यमांशी बोलतांना विरोधकांवर जोरदार टीका केली. बेस्ट निवडणूक ही राजकारणाची नव्हती, तर ही कामगारांची निवडणूक होती. बेस्टवर प्रेम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ही लढाई लढली. मात्र उबाठा आणि मनसेने याचे राजकीयकरण करण्याचा प्रयत्न केला, आणि त्याचाच परिणाम त्यांना भोगावा लागला. शून्य + शून्यची बेरीज म्हणजे शून्यच, हे मी आधीच सांगितलं होतं. आज त्यांच्या हातात भोपळा आला आहे. हा विजय मुंबईचा, मुंबईकरांचा, मराठीचा आहे, कामगारांचा आहे आणि भाजपचाही आहे.

याचबरोबर आशिष शेलार यांनी आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मोठा इशारा दिला. त्यांनी सांगितले की लवकरच भाजपच्या स्टार प्रचारकांची मोठी यादी जाहीर होईल. त्यात शशांक राव आणि प्रसाद लाड यांची नावे त्यांनी अधिकृतपणे स्टार प्रचारक म्हणून घोषित केली. शेलार पुढे म्हणाले, या दोघांनीच बेस्ट निवडणुकीत उबाठा आणि मनसेला मुंबईकरांचा आशीर्वाद कुठे आहे हे दाखवून दिलं.

शोले चित्रपटातील जय-वीरू प्रमाणेच ही जोडी आता मुंबई भाजपच्या निवडणुकीत मैदानात उतरणार आहे. यामुळे आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत शशांक राव आणि प्रसाद लाड यांची भूमिका किती प्रभावी ठरेल, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## संसदेत विधेयकांवर गदारोळ, विरोधकांकडून अमित शाहांवर विधेयकांच्या प्रती फेकल्या; कामकाज स्थगित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**

गंभीर गुन्हेगारी प्रकरणात अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना पदावरून दूर करण्यासाठी केंद्र सरकार कायदा करणार असल्याची घोषणा झाल्यानंतर आज संसदेत अभूतपूर्व गदारोळ झाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत यासंदर्भातील ३ विधेयके सादर केली.

यावेळी विरोधकांनी तिन्ही विधेयकांच्या प्रती फाडत थेट अमित शाहांच्या अंगावर फेकल्या. प्रचंड गोंधळामुळे लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी कामकाज स्थगित केले.

काँग्रेस, एआयएमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि समाजवादी पक्षाने या विधेयकांना विरोध दर्शविला. समाजवादी पक्षाने त्यांना न्यायविरोधी व संविधानविरोधी ठरवले. विरोधकांनी विधेयके मागे घेण्याची मागणी केली, तर अमित शहा यांनी संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) विधेयके पाठवण्याची मागणी केली.

**काय आहे तरतूद?**

या विधेयकांनुसार, जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना अशा गंभीर गुन्ह्यात अटक झाली ज्यासाठी किमान ५ वर्षांची शिक्षा होऊ शकते, आणि त्यांना सलग ३० दिवस कोठडीत ठेवले गेले, तर ३१व्या दिवशी आपोआप पदावरून काढले जाईल.

या पार्श्वभूमीवर सरकारने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल (६ महिने तुरुंगात राहूनही राजीनामा नाही) आणि तामिळनाडूचे मंत्री व्ही. सेंथिल बालाजी (४२१ दिवस तुरुंगात असूनही पदावर कायम) यांचा उल्लेख केला.

**प्रस्तावित विधेयके**

केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक २०२५ - केंद्रशासित प्रदेश कायदा १९६३ मध्ये सुधारणा करून, गंभीर गुन्ह्यात अटक झालेल्या मुख्यमंत्री/मंत्र्यांना पदावरून काढण्याची तरतूद.

१३० वे संविधान दुरुस्ती विधेयक २०२५ - संविधानातील कलम ७५, १६४ आणि २३९-- मध्ये सुधारणा करून, पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्य मुख्यमंत्री व मंत्री यांना अटक झाल्यास काढून टाकण्याचा अधिकार.

जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन (सुधारणा) विधेयक २०२५ - जम्मू-काश्मीर पुनर्गठन कायदा २०१९ मध्ये सुधारणा करून, अटक झालेल्या मुख्यमंत्री/मंत्र्यांना ३० दिवसांच्या आत पदावरून काढण्याची तरतूद.

## शरद पवारांना आणखी एक धक्का

### माजी आमदार राजू तिमांडे उद्याला अजित पवार गटात जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वर्धा**



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी शरद पवारांना एकापाठोपाठ एक धक्के बसत आहेत. अनेक जवळचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते शरद पवारांच्या राष्ट्रवादीची साथ सोडत आहेत. अशामध्ये वर्ध्यात शरद पवारांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. शरद पवार गटाच्या माजी आमदाराने पक्षाला रामराम ठोकला आहे. माजी आमदार राजू तिमांडे गुरूवारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये प्रवेश करणार आहेत. हिंगणघाटच्या निखाडे मंगल कार्यालयात कार्यकर्तासह ते अजित पवार गटात प्रवेश करणार आहेत.

मागील विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाने उमेदवारी न दिल्याने राजू तिमांडे नाराज होते. शरद पवारांनी तिकीट न दिल्यामुळे विधानसभा निवडणूक त्यांनी अपक्ष लढवली होती. या नाराजीतूनच त्यांनी शरद पवारांची साथ सोडली. गुरूवारी अजित पवार वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. वर्धामध्ये ते आढावा बैठक घेत पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. या बैठकीनंतर हिंगणघाट येथील बाजार समितीच्या कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यादरम्यानच राजू तिमांडे आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह अजित पवार गटात प्रवेश करणार आहेत.

## मुसळधार पावसाचा हाहाकार
## राज्यात २० लाख एकर क्षेत्रावर पिकांचे नुकसान

### कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वाशीम**

राज्यात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे खरिपाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील २० लाख १२ हजार ७७५ एकर क्षेत्राच्यावर पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यातील ११ जिल्ह्यात दहा हजार हेक्टरपेक्षा जास्त बाधित झाले आहेत. यात सर्वाधिक नुकसान नांदेड आणि वाशिम जिल्ह्यात झाले असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

साधारण आठवडाभरापासून राज्यातील वेगवेगळ्या भागात जोरदार पाऊस सुरु आहे. अनेक भागात तर अतिवृष्टी झाली असल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून या नुकसानीचे पंचनामे सुरू असून अहवाल मिळाल्यानंतर तात्काळ शेतकऱ्यांना मदत दिली जाईल. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

**१९ जिल्ह्यात झाला मुसळधार पाऊस**

राज्यातील तब्बल १९ जिल्ह्यांमधील १८७ तालुके आणि ६५४ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पाऊस झाला असून मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार ८ लाख ५ हजार ११० हेक्टर म्हणजे तब्बल २० लाख १२ हजार ७७५ एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १० हजार हेक्टरपेक्षा जास्त नुकसानग्रस्त क्षेत्र असलेले ११ जिल्हे समोर आले आहेत.

## दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर मुख्यमंत्री हाऊसमध्ये हल्ला : डोक्याला दुखापत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**

बुधवारी सकाळी मुख्यमंत्री निवासस्थानी झालेल्या जनसुनावणीदरम्यान दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर हल्ला झाला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, त्यांना थप्पड मारण्यात आली.

दिल्ली भाजप अध्यक्ष वीरेंद्र सक्सेना म्हणाले- आरोपीने मुख्यमंत्र्यांचा हात धरला आणि त्यांना ओढले. त्या टेबलाच्या कोपऱ्यावर आदळल्या. त्यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. थप्पड मारण्याची घटना चुकीची आहे.

हल्ल्याची पुष्टी करताना दिल्लीच्या मुख्यमंत्री कार्यालयाने एक निवेदन जारी केले. त्यात म्हटले आहे की- आज सार्वजनिक सुनावणीदरम्यान एका व्यक्तीने मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर हल्ला केला. त्याला दिल्ली पोलिसांनी पकडले आहे. त्याची चौकशी सुरू आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, आरोपीने स्वतःची ओळख राजेश भाई खिमजी (४१) अशी करून दिली आहे. तो गुजरातमधील राजकोटचा रहिवासी आहे.

या घटनेनंतर, दिल्लीचे मुख्य सचिव आणि अनेक मंत्री रेखा गुप्ता यांच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी मुख्यमंत्री निवासस्थानी पोहोचले. येथे मुख्यमंत्र्यांवर उपचार सुरू आहेत.

### संपादकीय ......

# काँग्रेसवरील एकतर्फी प्रेमात बुडालेली ठाकरेंची शिवसेना!

सध्या संसदेचे अधिवेशन सुरू आहे. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर होणारे हे अधिवेशन असल्यामुळे विरोधकांच्या टीकास्त्रांना चांगलीच धार आलेली आहे. त्यामुळे संसदेत सत्ताधारी आणि विरोधक असे युद्ध रंगलेले दिसत आहे. यावेळी राहुल गांधी यांनी अतिशय आक्रमक पवित्रा घेताना ऑपरेशन सिंदूरच्या काळात केंद्र सरकारकडून ज्या चुका झाल्या, त्याची पोलखोल केली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री यांनी राहुल गांधी यांना उत्तर देताना नेहरूंनी ज्या चुका केल्या त्याची फळे आपण भोगत आहोत, असे सांगितले. त्याचसोबत संसदेत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत हे अधिकच आक्रमक झालेले आहेत. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्याशी त्यांनी अधिक जवळीक वाढवायला सुरुवात केली आहे. नुकताच केंद्रात निवडणूक आयोगाच्या विरोधात इंडिया आघाडीचा मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी संजय राऊत हे राहुल गांधी यांच्या अगदी जवळ वावरताना दिसत होते. खासदारांना अटक करून बसमध्ये बसवण्यात आले त्यावेळीही राऊत राहुल यांच्या बाजूला बसलेले दिसले. इंडिया आघाडीची स्थापना ही विविध विरोधी पक्षांनी एकत्र येऊन नरेंद्र मोदींना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी झालेली होती. पण जशी लोकसभेची निवडणूक जवळ आली तसे त्यांना विविधतेत एकता साधण्यात अपयश आले. त्यामुळे भाजपचे संख्याबळ कमी झाले तरी चंद्राबाबू आणि नितीशकुमार यांच्या पाठिंब्यावर एनडीएची सत्ता केंद्रात आली. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेचा मोठा अपेक्षाभंग झाला. कारण इंडिया आघाडीने राहुल गांधी यांना पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून एकमताने जाहीर करावे, यासाठी संजय राऊत यांनी सर्वशक्ती पणाला लावली होती.

ठाकरेंच्या शिवसेनेचा भाजपवर राग असणे साहजिकच आहे, कारण भाजपने एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून शिवसेना फोडली. उद्धव ठाकरे यांना पक्षाचे नाव आणि चिन्ह गमवावे लागले. त्यांच्यासाठी ही मोठी मानहानी होती. त्यामुळे काहीही करून भाजपला आपण नेस्तनाबूत करायचे असाच ठाकरेंच्या शिवसेनेचा प्रयत्न असतो. यावेळी संसदेत अशीच संधी संजय राऊत यांना मिळाली. नेहरूंच्या चुका दाखवून वल्लभभाई पटेल यांचा जयजयकार करणार्या भाजप नेत्यांचे नेहमीच असे म्हणणे असते की, नेहरूंच्या जागी पटेल पंतप्रधान झाले असते तर आज देशाचे चित्र वेगळे दिसले असते. पण ते विसरतात की, वल्लभभाई पटेल यांनी केंद्रीय गृहमंत्री असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर त्यांनी बंदी घातली होती. हाच मुद्दा पकडून संजय राऊत यांनी भाजपच्या वर्मी घाव घातला. राऊत यांनी सांगितले की, जर वल्लभभाई पटेल आणखी दहा वर्षे जगले असते तर आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ राहिला नसता आणि त्यातून भाजपची निर्मिती झाली नसती, आज भाजपवाल्यांनो तुम्हीही संसदेत दिसला नसता. तुमचे नशीब समजा की त्यावेळी नेहरू पंतप्रधान होते. सरदार पटेल यांचे देशासाठी मोठे योगदान आहे यात शंकाच नाही, पण भाजपची त्यांच्याकडून जी भलामण करायला सुरुवात झाली त्यामागेही काही उदात्त हेतू नव्हता, त्यांना पटेलांना मोठे दाखवून नेहरूंना कमी दाखवायचे होते. त्या माध्यमातून त्यांचे वंशज असलेल्या गांधी घराण्याला टार्गेट करायचे होते. आता संजय राऊत यांना भाजपला टार्गेट करून त्यांच्या पंखातील हवा काढायची आहे, त्यामुळे ते काँग्रेसची बाजू घेऊन लढत आहेत. भाजपची ताकद ही केंद्रात असलेल्या नरेंद्र मोदी यांच्यामध्ये आहे. त्यामुळे जोपर्यंत मोदी हटत नाहीत, तोपर्यंत भाजपला आवरता येणार नाही, याची राऊत यांना कल्पना आहे. पण त्यासाठी मोठ्या ताकदीची गरज आहे, त्यामुळे ते काहीही करून काँग्रेसच्या बाजूने उभे राहत आहेत.एकनाथ शिंदे यांनी गुवाहाटी येथून बोलताना महाशक्ती आमच्या मागे आहे, असे म्हटले होते. आता मोदींना हटवण्यासाठी ठाकरेंची सेना काँग्रेस या महाशक्तीचा वापर करू पाहत आहे. त्यासाठी ते काँग्रेसच्या प्रेमात पडलेले आहेत, पण त्यांचे हे काँग्रेसवरील प्रेम एकतर्फी आहे हे कदाचित त्यांच्या लक्षात येत नसावे. कारण ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत हे काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर सातत्याने स्तुतीसुमने उधळताना दिसतात, पण सोनिया गांधी, राहुल गांधी हे कधी ठाकरेंच्या शिवसेनेबद्दल चार कौतुकाचे शब्द जाहीरपणे बोलताना दिसत नाहीत. एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. जेव्हा शरद पवारांच्या पुढाकाराने उद्धव ठाकरे यांना सोबत घेऊन राज्यात महाविकास आघाडीची स्थापना करण्यात आली, तेव्हा त्यात काँग्रेस सहभागी व्हायला तयार नव्हती. कारण ज्या आघाडीत शिवसेना आहे, त्यात त्यांना यायचे नव्हते. कारण शिवसेना हा त्यांना वैचारिकदृष्ट्या मानवणारा पक्ष नव्हता. पण मोदींना शह द्यायचा असेल तर काँग्रेसने आघाडीत यायला हवे, या युक्तिवादाने पवारांनी काँग्रेसचे मन वळवले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी जेव्हा संजय राऊत महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरेंच्या नावाची जोरदार फिल्डिंग लावत होते, तेव्हा राज्यातील काँग्रेसच्या मुख्य नेत्यांनी मुख्यमंत्री हा काँग्रेसचा होईल, असे स्पष्टपणे जाहीर केले होते. भाजपसोबतच्या युतीत शिवसेना २५ वर्षे सडली, असे आज उद्धव ठाकरे सांगत आहेत. आता ते त्याच भाजपला टक्कर देण्यासाठी काँग्रेसच्या प्रेमात बुडाले आहेत, पण काँग्रेसही राष्ट्रीय पक्ष आहे. त्यांचे हे प्रेम एकतर्फी आहे हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

## शेतजमीन खरेदी करताना फसवणूक टाळण्यासाठी

# सातबाऱ्यावरील 'ह्या' गोष्टी पाहणे महत्वाचे




कृषी विशेष

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

जमीन खरेदीत खोटा सातबारा, जमीन भलत्याच व्यक्तीच्या नावावर असणे, कोर्टात केस सुरू असणे अशा अनेक पद्धतींनी फसवणूक होण्याची शक्यता असते.

हे टाळण्यासाठी सात-बारा आणि आठ-अ हे उतारे तपासणे सगळ्यात महत्त्वाचे. जमिनीचं नाव, वर्णन, मालकाचं नाव, जमीन शेतीयोग्य आहे की नाही अशा गोष्टी सातबारामध्ये असतात.

सातबाराची मूळ प्रत पाहणं महत्त्वाचं आहे. छायांकित प्रतींवर विश्वास ठेवू नये. महाभूमी अभिलेखच्या संकेतस्थळावर एखाद्या जमिनीच्या उताऱ्याची डिजिटल सत्यांकित प्रत मिळू शकते.जमीन मालकी हक्काचे पुरावे तपासणे महत्त्वाचे आहे. एखाद्या व्यक्तीचे नाव सातबारावर आहे म्हणजे ती मालक असते असं नाही.जमिनीचा मूळ मालक कोण हे माहिती करून घेण्यासाठी फेरफार नोंद, रजिस्टर्ड सेल्स डीड आहे का तसेच जमीन विक्रीला सर्व वारसांची परवानगी आहे का हे तपासून बघणं आवश्यक आहे.

जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहाराला एखाद्या वारसाची परवानगी नसेल तरी त्याबाबतचे खटले कोर्टात वर्षानुवर्षे चालतात.जमीन कोणत्या झोनमध्ये आहे, ती शेतीसाठी आहे की बिनशेती हे तपासा. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे रेकॉर्ड्स तपासा. फेरफार सहा हाही जमीन खरेदीतला सर्वात महत्त्वाचा दस्तावेज आहे.जमिनीच्या मालकीमध्ये झालेल्या सर्व बदलांच्या नोंदी त्यात असतात. जमिनीवर कर्ज, लवाद किंवा नोटीस आहे का हे तपासण्यासाठी एनकम्ब्रन्स सर्टिफिकेट किंवा 'ईसी' तपासणं अत्यावश्यक आहे.

तहसील कार्यालयात जाऊन कागदपत्रं तपासणं, खरेदीखताचं नीट वाचन हेही गरजेचं आहे. जमीन खरेदी-विक्री व्यवहारात फसवणूक टाळायची असेल तर प्रत्यक्ष भेटी आणि जाणकार वकिलांचा सल्ला अत्यंत महत्त्वाचा आहे.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## नाश्त्यातील या पदार्थाने वाढतो हृदयविकाराचा धोका

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

सकाळचा नाश्ता चुकूनही स्कीप करू नये, असे तज्ञमंडळी सांगतात. कारण दिवसभर एनर्जेटिक राहण्यासाठी सकाळचा नाश्ता महत्त्वाची भूमिका निभावतो. साधारणपणे सकाळच्या नाश्त्यात दूध, अंडी, केळी किंवा अगदीच चहासोबत खारी, टोस्ट, बटर खाण्यात येते. पण, काहीजण सकाळच्या नाश्त्यात असे पदार्थ खातात, ज्यामुळे शरीराला आवश्यक पोषकत्तत्वे मिळण्याऐवजी आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. विशेष करून या पदार्थांमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. चला तर मग जाणून घेऊयात हृदय निरोगी राहण्यासाठी नाश्त्यातील असे पदार्थ जे नाश्त्यात खाणे टाळायला हवेत.



**पराठा आणि लोणचे –**

कित्येक घरात सकाळी पराठा आणि लोणचे नाश्त्यात खाल्ले जाते. पण, आरोग्यतज्ज्ञांच्या मते, पराठा आणि लोणच्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. पराठा बनवताना तेलाचा वापर केला जातो. ज्यामुळे पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. तसेच यात कॅलरी आणि फॅटचे प्रमाण जास्त असल्याने वजन वाढू शकतो.

**ब्रेड बटर –**सकाळी कामावर, शाळा-कॉलेजला जाताना उशीर होत असल्याने अनेकजण नाश्त्यात ब्रेड बटर खातात. पण, यामुळे हृदयाशी निगडित समस्या वाढू शकतात. विशेष करून व्हाईट ब्रेड पचण्यास जड असतो. ज्यामुळे पोटाचे विकार होऊ शकतात. याशिवाय बटरमध्ये अनसॅच्युरेटेड फॅट असतात, जे हार्टसाठी योग्य नसतात.

**कचोरी आणि मिठाई –**

जास्त गोड, साखरयुक्त मिठाईमुळे शरीरात जळजळ, लठ्ठपणा आणि रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. याशिवाय जास्त साखर खाल्ल्याने रक्दाबही वाढू शकतो. परिणामी, हृदयरोगाचा धोका वाढतो. तुम्ही जर कचोरी खात असाल तर तेही खाणे बंद करणे फायद्याचे ठरेल. कारण ती तेलात तळलेली असते.

**आलू भूजिया –**आलू भूजियामध्ये जास्त प्रमाणात मीठ असते. त्यामुळे ज्या व्यक्तींना उच्च रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी नाश्त्यात आलू भूजिया खाऊ नये.

**छोले कुलचे –** नाश्त्यात छोले कुलचे खाणे अगदी सामान्य आहे. पण, यात फॅटचे प्रमाण जास्त असते. परिणामी, जास्त प्रमाणात याचे सेवन केल्याने हृदयरोगाचा धोका वाढतो.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

## अतिवृष्टी नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करा -जिल्हाधिकारी अजित कुंभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अकोला-** अतिवृष्टीने नुकसान झालेल्या घरे, शेतीक्षेत्राचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. प्रत्येक नुकसानाची व्यवस्थित नोंद घ्यावी. मदतीपासून एकही शेतकरी वंचित राहता कामा नये, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज दिले.

जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी मूर्तिजापूर तालुक्यातील कंझारा, लाखपुरी, रसूलपूर आदी गावांना भेट देऊन तेथील शेती क्षेत्राची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, तहसीलदार शिल्पा बोबडे, संबंधित यंत्रणांचे अधिकारी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिका-यांनी ठिकठिकाणी प्रत्यक्ष नुकसानग्रस्त क्षेत्रात, शेतात पोहोचून पिकांची पाहणी केली, तसेच शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे जाणून घेतले व पंचनाम्याची प्रक्रिया जलदगतीने राबविण्याचे निर्देश यंत्रणांना दिले.



जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, शेतपीक, फळ बागांचे जिथे जिथे नुकसान झाले, त्या सर्व बाबींची तपशीलवार नोंद घेऊन नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत व त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा. भारतीय हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील काही दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यादृष्टीने सतर्कता बाळगावी व यंत्रणा सुसज्ज ठेवावी, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# महसूलमंत्री बावनकुळे यांना उद्देशून फेसबुकवर शिवीगाळ

## जीम मालका विरोधात गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नागपूर-** महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना फेसबुकवर अश्लिल भाषेत कमेंट करत शिवीगाळ करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात आरोपी जीममालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुनी कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला.

किशोर चरणदास मेश्राम (४२, वाठोडा) असे आरोपीचे नाव आहे. तर नवीन कामठी येथील भाजपचे कार्यकर्ते प्रमोद गेडाम (५५) यांनी तक्रार केली आहे. मेश्राम हा गेडाम यांचा फेसबुक फ्रेंड आहे. १६ ऑगस्ट रोजी बावनकुळे यांच्या हस्ते कामठी भाजीबाजाराजवळील धोबीघाटाचे बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. पवन शर्मा नावाच्या व्यक्तीने तेथील बावनकुळे यांच्या भाषणाचा व्हिडीओ फेसबुकवर शेअर केला. गेडाम यांनी दुसऱ्या दिवशी त्यांच्या अकाऊंटवरून तो व्हिडीओ शेअर केला. त्यावर मेश्रामने शिवीगाळ करत कमेंट लिहीली. रेतीघाटातून कमिशन मिळत नाही म्हणून बावनकुळे यांनी रेतीघाट बंद केले तसेच रजिस्ट्री कार्यालयातून काहीच भेटत नसल्याने रिसेलची रजिस्ट्रीदेखील बंद केली असे म्हणत मेश्रामने शिवीगाळ केली. ही कमेंट गेडाम यांनी पाहिली. बावनकुळे यांची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न यातून मेश्रामने केल्याचा आरोप गेडाम यांनी लावला व जुनी कामठी पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी आरोपी मेश्रामविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# बेस्ट निवडणुकीत ठाकरे बंधूच्या पॅनलचा सुपडा साफ

## भाजपला मात देत शंशाक राव डार्क हॉर्स ठरले किंगमेकर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मुंबई –**

मागील काही दिवसांपासून दी बेस्ट एम्प्लॉईज को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीची राज्यभरात चर्चा होती. या निवडणुकीच्या निमित्ताने उद्धव आणि राज हे ठाकरे बंधू २० वर्षानंतर एखाद्या निवडणुकीसाठी एकत्र आले होते. मात्र दोन्ही ठाकरे बंधूनी एकत्रीत लढवलेल्या पहिल्याच निवडणुकीत त्यांच्या पॅनलचा धुव्वा उडाला आहे. ठाकरे बंधूंच्या उत्कर्ष पॅनलला एकही जागा मिळाली नाही तर भाजप प्रणित सहकार समृद्धी पॅनलने सात जागांवर विजय मिळवला. या निवडणुकीत शंशाक राव डार्क हॉर्स ठरले आहेत. त्यांनी २१ पैकी १४ जागा जिंकत सर्वांचे अंदाज चुकवले.

मुंबई महापालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रयत्न सुरु आहेत. या निवडणुकापूर्वी बेस्ट पतपेढीची ही निवडणूक ठाकरे बंधूंच्या एकत्रिकरणामुळे काय चमत्कार घडू शकतो याची लिटमस टेस्ट मानली जात होती. मात्र या निवडणुकीत त्यांना २१ पैकी एकही जागा निवडून आणता आली नाही. विशेष म्हणजे गेल्या नऊ वर्षांपासून बेस्ट को ऑपरेटीव्ह सोसायटीवर ठाकरे गटाचे एकहाती वर्चस्व राहिलेले आहे. असे असताना कुठेही चर्चेत नसलेले शशांक राव यांनी शांतपणे आपले काम केले आणि त्यांच्या पॅनलला बेस्टच्या १५ हजार कर्मचाऱ्यांनी भरभरुन पाठिंबा दिल्याचे दिसत आहे.

भाजप प्रणित समृद्धी पॅनलचे ७ उमेदवार विजयी

बेस्ट पतपेढी निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रसाद लाड यांच्या सहकार समृद्धी पॅनलचे २१ पैकी ७ उमेदवार विजयी झाले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

# मालमत्ता खत, कोरे स्टँप, धनादेशासह दस्तावेज जप्त

## जिल्हा उपनिबंधक ३ पथकाकडून झाडाझडती





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती,**
उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावती यांचे कार्यालयात प्राप्त तक्रारीनुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्थेच्या तीन पथकाने मंगळवारला शहरातील तीन ठिकाणी धाडी टाकल्याने खळबळ उडाली. शहरातील दुर्गाविहार, इर्विन चौक, रहाटगावमध्ये सावकारांवर धाडी टाकून मालमत्ता खत, स्वाक्षरी केलेले कोरे धनादेश तसेच महत्वाचे दस्तावेज जप्त केले.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अगरवती कार्यालयाने तीन धाड पथकाची नेमणूक केली. मदनलाल रतनलाल राठी, प्रथमेश अर्पाट दुर्गाविहार, निलेशरमेशराव ठाकरे, राहगाव आणि गोपाल रतनलाल राठी, रा. इर्विन चौक कॅम्प अमरावती यांचे घरी धाडटाकूनझाडाझडतीघेण्यात आली.

पहिल्या पथकाचे प्रमुख अनिरुध्द राऊत (सहायक निबंधक प्रशासन) सुधीर मानकर, शेळके, श्रीमती शितल किटुकले, पंच निवन पाये व मनोज राऊत पोलीस-श्रीमती पुनम पोटे, निलेश गावनेर निलेश रमेशराव ठाकरे, राहटगाव ता.नि. अमरावती यांचे घरी धाड टाकली. या ठिकाणावरून पथकाने स्थावर मालमत्ता खरेदी खत, नोंद वही, टोकन पावतींसह कागदपत्रे जप्त केली.

दुसऱ्या पथकाने दुर्गाविहार मध्ये कारवाई केली. प्रथक प्रमुख श्रीमती स्वाती गुडदे (सहायक निबंधक मोर्शी), प्रशांत ढोके, नरेंद्र इंगळे, राहुल पूरी, पंच अश्विनी शेंडे व सोनाली दोगणे, यांनी मदनलाल रतनलाल राठी, रा. दुर्गाविहार येथे छापा टाकला. या ठिकाणी ११.४५ ते २.५० वा. पर्यंत कारवाई सुरु होती. येथून स्वाक्षरी असलेले बँकेचे धनादेश, नोंद असलेली कागदपत्रे, चिठ्ठा पाने चौकशी साठी जप्त केले आहे.

तिसरी कारवाई ही इर्विन परीसरात करण्यात आली. पथक क्र.३ चे प्रमुख श्रीमती प्रीती धामणे (सहा. निबंधक तिवसा), मनोन रोहणकर, अझहर खान,सचिन अढाऊ, पंच शिवमसाखरकर, सुरज घाटोळ, पोलिस वंदना चव्हाण, योगेश इंगोले यांनी गोपाल रतनलाल राठी, इर्विन चौक कॅम्प येथे धाड टाकून झडती घेतली. ही कारवाईसकाळी ११.२० ते ३.२० वा. पर्यंतसुरु होती. याठिकाणावरून ११ कोरे स्टॅम्प पेपर, कोरे व स्वाक्षरी असलेले बँकेचे धनादेश, नोंदी असलेले रजीस्टर, जमा चिठ्ठी, स्थावर मालमत्ता खरेदी खत धाड पथकाने चौकशीकरीता ताब्यात घेतलेले आहे. जन केलेल्या कागदपत्रांची पडताळणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतूदीनुसार करुन सदर अहवाल उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावती यांना सादर करतील, असे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी सांगीतले आहे.

# आ. रवी राणा यांची कुलंगणा येथे भेट

## नरभक्षक वाघाचा तात्काळ बंदोबस्ताचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चिखलदरा,**
अध्यक्ष, विधानसभा आश्वासन समिती व आमदार रवी राणा यांनी चिखलदरा तालुक्यातील कुलंगणा गावात वाघाच्या हल्लयात मृत्यू पावलेले प्रवीण सुक्रम बेलसरे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना सांत्वन केले.या प्रसंगी आ. राणा यांनी घटना स्थळावरून थेट विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक श्री. रेड्डी यांच्याशी संपर्क साधून नरभक्षक वाघाला तात्काळ पकडून अन्यत्र हलविण्याचे आदेश दिले.

वन विभागामार्फत मंजूर झालेल्या २५ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश उद्या आमदार केवलराम काळे यांच्या हस्ते पीडित कुटुंबाला देण्यात येणार असल्याची माहितीही आ. राणा यांनी दिली.

या पाहणी दौऱ्यात -उत्र श्री. घारगे, तहसीलदार श्री. मोराणकर, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, आ. काळे यांचे सुपुत्र यशवंत काळे, युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी उपेंद्र बचले, राम हेगडे, प्रमोद शनिवारे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. राणा यांनी नरभक्षक वाघाच्या बंदोबस्तासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

स्थानिक नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने यावेळी आमदार राणा यांच्यासोबत उपस्थित होते.

# गणेशोत्सवासाठी मंडप परवानगी आता ऑनलाईन

## अमरावती महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** - येणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने नागरिकांच्या सुविधेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मंडप परवानगीसाठी यंदा ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली असून, त्यासाठी टठ कोड व https://mandap.amravaticorporation.in या अधिकृत पोर्टलचा वापर करता येणार आहे.या नव्या सुविधेमुळे गणेशोत्सव मंडळांना परवानगीसाठी महा पालिकेत प्रत्यक्ष येण्याची गरज नाही.




केवळ टठ कोड स्कॅन करून किंवा वरील पोर्टलला भेट देऊन आवश्यक ती माहिती भरता येईल व दस्तऐवज अपलोड करता येतील. महानगर पालिकेचे आयुक्तांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, गणेशोत्सव हा शहरातील एक महत्त्वाचा सण असून, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आम्ही ही ऑनलाईन प्रक्रिया सुरू केली आहे. याद्वारे पारदर्शकता, कार्यक्षमतेत वाढ होणार असून वेळेची बचत होईल.

**परवानगी अर्ज प्रक्रियेत समाविष्ट प्रमुख बाबी:** मंडळाचे नाव व संपर्क तपशील मंडपाचा पत्ता व आराखडा आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन पोलीस व अग्निशमन विभागाची अनुमती नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महा पालिकेकडून करण्यात आले आहे.

# फक्त अधिकृत ठिकाणीच गणेश मूर्ती विक्रीला परवानगी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** -, ४गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील प्रमुख रस्त्यांवर आणि चौकांमध्ये फेरीवाले मूर्ती व पूजेच्या साहित्याची विक्री करीत असल्याचे आढळून आले आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो तसेच नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महत्त्वाची सूचना जारी केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, शहरातील झोन क्र. १ ते ५ अंतर्गत विक्रीसाठी ठराविक जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. विक्रेत्यांनी केवळ या अधिकृत ठिकाणीच स्टॉल लावावेत. तसेच, संबंधित झोन उपअभियंता यांच्याकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. मुख्य रस्ते व चौकांवर अनधिकृत विक्री करू नये.

अधिकृत विक्रीसाठी नेमून दिलेल्या जागा पुढीलप्रमाणे आहेत:

झोन क्र. १ - नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, पंचवटी चौक ते कांतानगर, संत गाडगेबाबा समाधी मंदिरासमोरील खुले मैदानझोन क्र. २ - नेहरू मैदान, सायन्सकॉर मैदान, अंबिका नगर मनपा शाळा मैदान, नंदा मार्केट (श्री. दातेराव यांचे खुले मैदान)झोन क्र. ३ - सर्किट हाऊसजवळील शॉपिंग मॉलसाठी आरक्षित खुली जागाझोन क्र. ४ - सोमवार बाजार येथील खुली जागा, झोन कार्यालय मधील मैदानातील खुली जागा रेल्वे स्टेशनकडील बाजूला, साईनगर महाराष्ट्र बँकेच्या समोरील खुली जागाझोन क्र. ५ - न्यू गणेश कॉलनी येथील मैदान ( सोनार समाज मंगल कार्यालय लगत)

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी विक्रेत्यांना आवाहन केले की, गणेशोत्सव हा आपला सांस्कृतिक व धार्मिक वारसा आहे. तो शांततेत, सुरक्षिततेत आणि शिस्तबद्धतेने साजरा करण्यासाठी नागरिक व विक्रेत्यांनी महानगरपालिकेस सहकार्य करावे.

# अनुसूचित जमाती कल्याण समितीनेविविध विभागांचा घेतला आढावा





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती** - अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दौरा आजपासून सुरू झाला आहे. समिती आजपासून दोन दिवस धारणी आणि चिखलदरा तालुक्याचा दौरा करणार आहे. अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दौऱ्यानिमित्त शासकीय विश्रामगृहात आज सकाळी समितीच्या सदस्यांनी चर्चा केली. जिल्ह्यातील नागरिक, लोकप्रतिनिधी, संस्थांचे प्रतिनिधी यांचे निवेदने स्विकारली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात समितीचे प्रमुख दौलत दरोडा यांच्यासह समितीचे सदस्य केवलराम काळे, राजू तोडसाम, शांताराम मोरे, मंजुळा गावित, रामदास मसराम, उमा खापरे, राजेश राठोड, विनोद निकोले यांनी समितीच्या कामकाजात सहभाग घेतला. समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपालिका, नगर परिषद, पोलिस विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, राज्य उत्पादन शुल्क, वन, पुरवठा, क्रिडा, कृषी, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, शिक्षण, सामान्य प्रशासन, बांधकाम, पाणीपुरवठा, लघू पाटबंधारे, आरोग्य, आदिवासी विकास, जिल्हा परिषद, प्रादेशिक परिवहन, राज्य परिवहन महामंडळाचा आढावा घेतला. समिती सदस्यांनी प्रत्येक विभागातील पदभरती, आरक्षण, अनुशेष, जात पडताळणी, तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत चर्चा केली. तसेच उपयुक्त सूचना केल्या.

# आई-वडिलांसमोरच चिमुकला पुरात वाहून गेला।

## कुलंगणा येथील हृदयद्रावक घटना

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०चिखलदरा**

आई-वडिलांच्या डोळ्यादेखत चिमुकला पुरात वाहून गेल्याची हृदयद्रावक घटना कुलंगणा येथे घडली. आनंद रामकिसन मावस्कर (८) असे पुरात वाहून गेलेल्या मुलाचे नाव आहे. मावस्कर कुटुंब मोझरी येथून ३ कि.मी. जंगलात असलेल्या महादेव मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शन झाल्यानंतर तेथून दर्शन करून परत येत असताना परतीच्या वाटेवर नाल्याला पूर आलेला होता. हा नाला ओलांडण्याचा प्रयत्न करत असताना पाण्याच्या जोरदार प्रवाहात आनंद वाहून गेला. विशेष म्हणजे आई-वडिलांच्या समोरच तो पाण्याच्या प्रवाहात



वाहत गेला.यावेळी आई-वडिलांनी वाचविण्यासाठी त्याला आरडाओरड केली; मात्र पाण्याचा वेग इतका प्रचंड होता की, पाहताक्षणीच आनंद दिसेनासा झाला. काही लोकांनी नाल्याच्या कडेने शोधमोहीम राबवून एका तासात अर्ध्या किमी अंतरावरून आनंदला शोधून काढले; परंतु तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.या घटनेने कुलंगणा गावात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.-

# प्रशासनाकडून गणेशोत्सवाची तयारी जोरात

## जिल्ह्यात २००० वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती-** सर्वजण आतुरतेने वाट पाहत असलेल्या गणेशोत्सव आता अवघ्या ८ दिवसावर आला आहे. त्यामुळे एकीकडे मूर्तिकार गणेशमूर्तींचे बांधकाम वेगाने पूर्ण करत आहेत. दुसरीकडे, प्रशासनही 'बाप्पा'च्या स्वागतासाठी जोरदार तयारी करत आहे. सोबत गणेश मंडळाचे सुद्धा गणेशोत्सवासाठी युद्धपातळीवर काम सुरू झाले आहे. दरम्यान, शहरासह जिल्ह्यात एकूण २००० पेक्षा अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात या वर्षी गणराया विराजमान होत असल्याची प्राथमिक माहिती आहे. तर ३८४ ठिकाणी 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबविण्यात येत आहे.सुरक्षेसाठी ८० टक्के मनुष्यबळ तैनात दहा दिवसांच्या गणेशोत्सव काळात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संवेदनशील परिसरांची यादी



पोलिसांच्या गोपनीय विभागाने तयार केली आहे. तसेच, या काळात सर्वसामान्यांना असामाजिकघटकांकडून कोणताही त्रास होऊ नये यासाठी, शहर आणि ग्रामीण पोलिस देखील त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रात प्रतिबंधात्मक कारवाईकरत आहेत. याशिवाय, सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान, शहर आणि ग्रामीण पोलिसांचे सुमारे ८० टक्के मनुष्यबळ कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सुरक्षेसाठी आणि व्यवस्थेसाठी तैनात केले जाईल. विशेष म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सवासाठी प्रशासनाची परवानगी अनिवार्य असून यासाठी पोलिस आयुक्तालयात 'एक खिडकी' योजना सुद्धा सुरु करण्यात आली आहे. यावर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही होणार असल्याने, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्याच वेळी, शहराच्या हद्दीला लागून असलेल्या ग्राम पंचायत क्षेत्रातील ३७ गावांमध्ये

## पोलीस विभागाकडून बंदोबस्ताचे नियोजन सुरू

'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना गेल्या वर्षी राबविण्यात आली. याशिवाय, ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या १४ तहसीलमधील ३१ पोलिस ठाणे क्षेत्रात गेल्या वर्षी १३१८ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची नोंदणी झाली. त्यापैकी ३४७ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' अशी नोंदणी करण्यात आली होती.या वर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत १० दिवसांचा गणेशोत्सव साजरा होणार आहे. दरवर्षी १० दिवसांच्या गणेशोत्सवादरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे पोलिस विभागासाठी खूप आव्हानात्मक काम असते. त्यादृष्टीने पोलिसांनी पोलिस ठाण्याच्या आधारे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या अधिकाऱ्यां सोबत बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. त्याअंतर्गत शहर पोलिस आणि ग्रामीण पोलिस बैठका आणि चर्चा करत आहेत.

**तब्बल २३ वर्षांनंतर निर्णय...**

# पीपल्स को-ऑप. बँकेच्या संचालकांना न्याय

**ॲड. प्रशांत देशपांडेसह इतरांचा यशस्वी युक्तीवाद**

## सर्व आरोपी निर्दोष मुक्त जिल्हा सत्र न्यायालयाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

२३ वर्षांपूर्वी अमरावती शहरातील बहुचर्चित पीपल्स बँक घोटाळा प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाने मंगळवार, १९ ऑगस्ट रोजी सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. त्यामुळे २३ वर्षांनंतर बँकेच्या संचालक मंडळाला न्याय मिळाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २००२ मध्ये, अमरावतीच्या मुख्य शाखेतील पीपल्स को-ऑप. बँकेचे तत्कालीन विभागीय सह निबंधक (लेखापरीक्षक) अधिकारी बाबाराव बिहाडे यांनी १५ मे २००२ रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

संचालक मंडळाने त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी रु. २६ जानेवारी २००१ रोजी गिलटेक मॅनेजमेंट सर्व्हिसला ४ कोटी आणि२६ मार्च २००२ रोजी व्हेंचुरा डीलर्स प्रायव्हेट लिमिटेडला ५ कोटी ५० लाख रुपये दिले. कंपनीमार्फत सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करण्यात आली. संचालकांवर आरोप होता की या कंपन्यांमार्फत गुंतवलेले पैसे त्यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी सदर कंपनीत जाणूनबुजून गुंतवले. त्यानंतर संयुक्त निबंधक अधिकाऱ्यांमार्फत बँकेचे ऑडिट करण्यात आले आणि पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर अमरावतीजिल्हासत्रन्यायालयात संचालक मंडळाविरुद्ध आरोप दाखल करण्यात आले.

पीपल्स को-ऑप. बँकेचे संचालक वसंतराव साऊरकर, ईश्वरदास घोम, सदाशिव मस्करे, घनश्याम मुदगल, भोजराज गुप्ता, जयश्री पाटील, ज्ञानेश्वर माळोदे, राजेंद्र सोने, मुकुंदराव शांडिल्य,जयंत चेडे, चंदलाल काळे, रंगलाल काळे, ए. साने, माया अंबुलकर, सुधाकर जोशी, दत्तात्रय मावळकर, श्रीकांत उतीकर, केतन सेठ, महेंद्र अग्रवाल, संजय अग्रवाल, सुबोध भंडारी, नंदकिशोर शंकरलाल त्रिवेदी यांच्यावर कलम ४०६, ४०९, ४६८,



१२० (ब) ३४ अन्वये कोटवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. संचालक वसंतरावसाऊरकर यांच्या वतीने ॲड. प्रशांत देशपांडे यांनी या खटल्याचा यशस्वी युक्तीवाद केला. त्यांनी संचालक मंडळावरील आरोप निराधार असल्याचे सिद्ध करण्यासाठी काही महत्त्वाचे पुरावे न्यायालयासमोर ठेवले. बँकेला केलेल्या गुंतवणुकीतून फायदा झाला असला तरी, बँकेला सुरक्षा रक्कम मिळाली आहे आणि उर्वरित रक्कम सीजीएमच्या खात्यात जमा केली आहे. ॲड. प्रशांत देशपांडे यांनी ही बाब - न्यायालयासमोर आणली तेव्हा त्यांनी न्यायालयाला असेही सांगितले की या प्रकरणात बँकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. नंतर ॲड. देशपांडे यांनीही कोर्टाला सांगितले की बँकेने केलेल्या गुंतवणुकीतून बँकेला फायदा झाला आहे. न्यायालयाने या संपूर्ण प्रकरणात १४ साक्षीदारांचे जबाब नोंदवले आणि अखेर १९ ऑगस्ट रोजी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. त्यामुळे ॲड. प्रशांत देशपांडे यांनी म्हटले आहेकीपीपल्सको-ऑप बँकेच्या संचालक मंडळाला २३ वर्षांनंतर न्यायमिळाला. एकाच न्यायालयात वेगवेगळ्या संचालक मंडळांच्या वतीने वेगवेगळ्या वकिलांनी यशस्वीपणे बाजू मांडली. या वकिलांमध्ये ॲड. वासुदेव नवलानी, ॲड. आर.एम. अग्रवाल, ॲड. अनंत विघे, ॲड. धर्मेश सबलानी, ॲड. प्रदीप कोकाटे, ॲड. केवले आणि इतर वकीलांचा समावेश आहे. या संचालक मंडळातील काही संचालकांचे निधन झाल्याचे सांगण्यात आले.

# सोन्याच्या बांगड्यांवर चोरट्यांचा डल्ला, लाखोंचा माल उडविला

## वर्मा ज्वेलर्स मधील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती** -सिटी कोतवाली पोलिस स्टेशन हद्दीतील रायली प्लॉट मध्ये असलेल्या बजरंग लाल छोटेलाल वर्मा ज्वेलर्स शोरूममधून ५.५० लाखांच्या ५५.७०० ग्रॅम सोन्याच्या बांगड्या लंपास केल्या. ग्राहक म्हणून आलेल्या २ बुरखाधारी महिलांनी सोन्याच्या बांगड्या पाहण्याच्या बहाण्याने ही करामत केली. पोलिस या दोन्ही बुरखाधारी महिलांचा शोध घेत आहे.याप्रकरणी प्रतिष्ठानाचे संचालक बजरंग लाल छोटेलाल वर्मा (५२) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, सोमवारल १८ ऑगस्टरोजीदुपारी ४ वाजण्याच्या सुमारास, दोन अज्ञात बुरखाधारी महिला त्यांच्या दुकानात पोहोचल्या आणि



सोन्याच्या बांगड्या आणि बांगड्या दाखवण्यास सांगितले. त्यामुळे दुकानातील कर्मचाऱ्यांनी त्यांना वेगवेगळ्या डिझाइनच्या बांगड्या दाखवल्या दोन महिला

त्या दोघांनीही त्यांच्या हातावर त्या वापरून पाहिल्या. हातातील बांगड्या काढून परत केल्यानंतर, दोन्ही महिला दुकानातून बाहेर पडल्या आणि कोणत्याही बांगड्यान घेता निघून गेल्या. पण त्यानंतर लगेचच, दुकानातील कर्मचाऱ्यांनी सोन्याच्या बांगड्या मोजल्या तेव्हा त्यांना दोन बांगड्या गायब आढळल्या. त्यामुळे व्यवस्थापकाने ताबडतोब दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले तेव्हा असे आढळून आले की बांगड्या पाहत असताना, दोन्ही महिलांपैकी एकीने दोन्ही सेल्स गर्ल्सच्या नजरेआड हुशारीने दोन्ही सोन्याच्या बांगड्या तिच्या कपड्यां मध्ये लपवल्या. त्यानंतर दोन्ही महिलालगेचच तिथून निघून गेल्या. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी बीएनएसच्या कलम ३०२ (२) आणि ३ (५) अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल केला आणि तपास सुरू केला.

# सिंदूरला समर्पित नवाथेचा दहीहांडी उत्सव विनापरवानगी !

## आयोजकांवर दोन गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती** :भाजप व युवा स्वाभिमान आयोजित नवाथे चौकातील रविवारच्या दहिहंडीला विनापरवागी ठरवत राजापेठ पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केलेत. युवा स्वाभिमानचे जिल्हाध्यक्ष अजय देशमुख व अन्य आयोजकांविरुध्द विनापरवानगी दहिहंडीचे आयोजन व उशिरा रात्रीपर्यंत डीजे वाजविल्याबाबत ते गुन्हे नोंदविण्यात आले. देशमुख व अन्य आयोजनांनी विनापरवानगी आम रस्त्यावर दहिहंडीचा स्टेज उभारून रहदारीस अडथळा निर्माण केला, अशी फिर्याद पोलिस अंमलदार दिनेश आखरे यांनी राजापेठ पोलिसांत नोंदविली. विशेष म्हणजे संपूर्ण दहिहंडीला पोलिसांचे सुरक्षा कवच होते.दहिहंडी पार पडल्यानंतर ती दहिहंडी विनापरवानगी नवाथे चौकात घेतल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला, तर दुसरा ठेवल्याबाबत नोंदविण्यात आला. गुन्हा रात्री १०.३० पर्यंत डीजे सुरूआयोजकांना वारंवार सूचना देण्यात आली.रात्री १०.४० पर्यंत डीजे व आतषबाजी त्या सूचना अव्हेरून आयोजकांनी सुरूच ठेवली. त्यातही अजय देशमुख व अन्य आयोजकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

**छायाचित्रकारांच्या कला-प्रवासाची साक्ष**

# जागतिक छायाचित्र दिनानिमित्त शहरात भव्य कॅमेरा दिंडी

## ठिकठिकाणी स्वागत, पूजन - मान्यवरांचा सहभाग, अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशनचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती-**

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशन तर्फे आज, १९ ऑगस्ट रोजी भव्य कॅमेरा दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीने संपूर्ण शहरात वेगळेच आकर्षण निर्माण केले.श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रवेशद्वार येथे पालखीत ठेवलेल्या कॅमेराचे पूजन ज्येष्ठ फोटोग्राफर संजय नारायणराव दुर्गे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रदेश कार्यकारिणी सदस्य (भाजपा) निवेदिताताई चौधरी (दिघडे) उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यशदादा संजय खोडके आणि युवा सामाजिक कार्यकर्ता शिवानंद चौधरी यांनी कॅमेराचे विधिवत पूजन केले.यावेळी अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष निलश्याम चौधरी, सचिव अक्षय इंगोले, कोषाध्यक्ष निखिल तिवारी आदी उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.यानंतर असोसिएशनच्या गीतावर दिंडीला प्रारंभ झाला. शहरातील प्रमुख मार्गांवरून कॅमेरा दिंडी पुढे सरकली. ठिकठिकाणी दिंडीचे उत्साहाने स्वागत व पूजन





करण्यात आले. छायाचित्रकारांच्या कला-प्रवासाची साक्ष ठरलेली ही अनोखी दिंडी हा दिवस संस्मरणीय ठरवणारी ठरली.

**असोसिएशनची भूमिका व उद्गार** - अंबानगरी फोटो-व्हिडिओग्राफर्स असोसिएशनने गेल्या काही वर्षांत छायाचित्रकारांच्या एकतेसाठी, त्यांचे प्रश्न व हक्क मांडण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. कॅमेरा दिंडीचे आयोजन हा त्याच सातत्याचा भाग असून, या उपक्रमातून व्यवसायातील कलात्मकता, व्यावसायिक एकजूट आणि सामाजिक बांधिलकी यांचे दर्शन घडविण्यात आले.

**दिंडीत सहभागी पदाधिकारी** - प्रकल्प प्रमुख - श्री संदीप नाईक, सह प्रकल्प प्रमुख - श्री पवन देशमुख, श्रीकांत भेंडे, प्रशांत गजभिये, अजय गावंडे, अंकुश राउत, सोहेल अहमद, सागर काजले, धीरज भाकरे, मयूर राउत, नेत्रादिप चिपडे, रविन्द्र भमोदकर, रोशन शिरभाते, आकाश इंगोले, सोपान सगने, गौरव बायस्कर, तुषार इंगले, श्याम गादगे, शुभम लाटे, सूरज गायकवाड, सर्वेश इंगले. उपाध्यक्ष - गजानन अंबाडकर, महेंन्द्र मोहोड, आकाश लादे, सहसचिव - सचिन देशमुख, सहकोशाध्यक्ष - संदीप नाईक. कार्यकारणी सदस्य - अनंत जामोदकर, राहुल शर्मा, नितेष झा, अजिंक्य सातपुते, सोहेल अहमद, शुभम डोईफोडे, सागर काजळे, स्वप्निल मनवर, धिरज मानमोडे, रोषन अग्रवाल, हेमंत श्रीवास्तव, माजी अध्यक्ष अनिल सातपुते, विजय देवाणी, अनिल पडिया, वैभव दलाल, मनिष जगताप, राहुल पवार, दिलीप जिरापुरे, राजेश वाडेकर. सल्लागार -राहुल पालेकर, प्रशांत टाके, नरेश जिरापुरे, अरविंद भुगुल, रुपेश फसाटे. ज्येष्ठ सभासद - जयंतराव दलाल, विनय तिवारी, नाना चैधरी, महेश सबनिस, प्रमोद जावळे, संदिप पाटिल, रामेश्वर गुल्हाणे. सदस्य - प्रतिक रोहणकर, महेंन्द्र किल्लेकर, मंगेश घाटोळ, प्रशांत गजभिये, मोहन देशमुख, तनविर अहमद, संजय वाडकर, निलेश चैव्हान, अक्षय डोईफोडे, पंकज पाचपोर, अब्दुल मोहसीन, रोषन खैरे, मोहन कोहळे, आदित्य ठाकरे, अमित खैरकर, मयुर कासार, डॉ. गोपाल बेलोकर, आषिश आर्विकर, संयम सिंघई, छायाताई काळमेघ, पुष्पक राउत, पवन देशमुख, आकाश देशमुख, शिवा देशमुख, अक्षय धर्माळे, अजय गावंडे, आकाश दवंडे, आशिष दरणे, बबलु अस्वार, दिनकर तायडे, घनश्याम चैधरी, गोविंद खत्री, हरिश यावले, ललित धुळे, मयुर राउत, नेत्रदिप चिपडे, निखिल गजभिये, सागर काठोळे, शोनील सुखदेवे, श्याम गादगे, स्वप्नील तडस, विनोद ढवळे, दिनेश गवई, ऋशभ वाकोडे, निलेश सबनिस, सचिन गंजीवाले, श्रीकांत भेंडे, विजय मोरे, विपुल तन्ना, महेश बेलोदे, सुरज गायकवाड, तेजस टाले, धिरज भाकरे, हर्शल काटकर, रोशन शिरभाते, अविनाश देशमुख, पवन शेंद्रे, अंकुश राउत, शुभम धोटे, विशाल भगत, नयन ढेरे, राज रंगारकर, रविंद्र भामोदकर, मयुर डाहाके, रुपेश वरुडकर, ऋशिकेष गुल्हाणे, रुत्वीक महल्ले, सौरभ तिवारे, शेखर गंथळे, शुभम अंबाडकर, भूषण रडके, विनोद थोरात, अभिजीत मेश्राम, देवेंद्र वाटाणे, रितेश वर्मा, युवराज बहादुरकर, आकाश काळे, सुरेश माळोदे, सुमित करडे, रितेश भगत, केतन इंगोले, हेमंत मानकर, आकाश इंगोले, सर्वेष बहादुरे, दिलीप दाते, सोपान सगणे, प्रितेश वानखडे, संकेत भोंगे, मंगेश निलातकर, राकेश जवंजाळ, विकास हिंगे, रमेश खेडकर, ललित ठाकरे, नितीन धुमाळे, आदित्य सुरातकर, तुशार इंगळे, जिवन मोहोड, सागर काकड, अश्विनी वानखडे, महेंद्र खरे, आदेश तायडे, गणेश चैधरी, विशाल वाकोडे, गौरव बायस्कर, मिलींद नाईक, शिवानंद चैधरी, रुपेश वानखडे, रुपेश खंडारे, रितेश हातागडे, चेतन फुलंब्रीकर, सर्वेष इंगळे, निखिल कुटेमाटे, प्रज्वल मुंडाणे, प्रज्वल यावले, अभिजीत गावंडे, इम्रान शाह, सुमित भावे, संजय साहु, शुभम लाटे, कुनाल राउत, विनोद खरड, भुपेंद्र दुरगडे, बुध्दानंद अघम उपस्थित होते.

### छायाचित्रकारांचा पारंपरिक वेशभूषेत सहभाग

भव्य कॅमेरा दिंडीत छायाचित्रकार, व्हिडिओग्राफर्स व असोसिएशनचे सदस्य पारंपरिक कुर्ता-पायजमा व रंगीबेरंगी फेट्यांत सहभागी झाले. विशेष आकर्षण म्हणून राजमाता जिजाऊ, झाशीची राणी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत मुलांनी उपस्थित राहून दिंडीला वेगळेच सौंदर्य दिले.

### ठिकठिकाणी स्वागत, पूजन

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे विधिवत पूजनानंतर दिंडीला सुरुवात झाली. गांधी चौक, राजकमल चौक, जयस्तंभ चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पुतळ्यास अभिवादन करून समारोप झाला. मार्गक्रमणात विविध मान्यवरांनी भेटी दिल्या व ठिकठिकाणी स्वागत, पूजन करण्यात आले.

### आकर्षक वेशभूषा व पारंपरिक वाद्यांच्या गजरात दुमदुमले शहर

भव्य कॅमेरा दिंडीत राजमाता जिजाऊच्या वेशभूषेत वैष्णवी जाधव, झाशीची राणीच्या वेशभूषेत जरिया तनवीर अहमद तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशात वेदांत भुगुल (फोटोग्राफराचे मुल) यांनी सहभाग घेऊन उपस्थितांचे लक्ष वेधले. यासोबतच जय भवानी वारकरी दिंडी बेलोरा, रामराज्य प्रतिष्ठान ढोल पथक, प्रवीण डी.जे. साउंड व तुकदयादास एल.ई.डी. यांच्या सहभागामुळे दिंडीला अधिकच शोभा प्राप्त झाली. कॅमेऱ्यांच्या कलात्मक सजावटी व पारंपरिक वाद्यांच्या गजरात संपूर्ण शहर दुमदुमले असून, दिंडी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

# जि. प. कर्मचारी अडचणीत कॅन्टीनसाठी जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२० अमरावती**

जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना दैनंदिन जेवणाची समस्या भेडसावत असून, या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांनी कार्यालय परिसरात स्वतंत्र कॅन्टीनची मागणी केली आहे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्यासह शासन-प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.


सध्या जिल्हा परिषदेत १४ विभागांतून सुमारे २५० कर्मचारी सकाळी ९.४५ वाजेपासून उशिरा सायंकाळपर्यंत कार्यरत असतात. दुपारचे भोजन सोबत आणले तरी जिल्हा परिषद भवनात जेवणासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध नाही. परिणामी कर्मचाऱ्यांना कधी बाहेर रस्त्याच्या कडेला, तर कधी कोरिडॉरमध्ये बसून जेवावे लागते. परिसरातील खासगी हॉटेल्स किंवा कॅन्टीनमध्ये जाणे वेळखाऊ ठरत असल्याने तेही परवडत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची मोठी कोंडी होत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटना पुढे सरसावली असून, या मागणीला कायदेशीर आधार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या ट्रेड युनियन धोरणानुसार संघटनेला मान्यता प्राप्त असल्याने, अशा मूलभूत सुविधांची मागणी करण्याचा अधिकार कर्मचाऱ्यांना आहे, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.संघटनेचे अध्यक्ष पंकज गुल्हाने आणि सचिव संजय राठी यांनी या मागणीसाठी पुढाकार घेतला आहे. निवेदनात जि. प. भवनातील सध्या रिक्त असलेल्या दालनांचा उपयोग कॅन्टीनसाठी करता येईल, असेही सुचविण्यात आले आहे. मात्र प्रशासकीय राजवटीमुळे अनेक दालने रिक्त असली, तरी काही ठिकाणी नव्या कार्यालयीन कामकाजासाठी त्या जागांचा उपयोग केला जात असल्याने ही व्यवस्था तात्पुरतीच ठरली आहे.आता या मागणीवर प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे कर्मचाऱ्यांसह जिल्हा परिषदेतील सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पावसामुळे रेल्वेगाड्या रद्द, तर काही रेल्वेगाड्या नाशिकपर्यंत धावणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०बडनेरा:**

अमरावती विभागात सुरू असलेल्यामुसळधार पावसामुळे, काही प्रवाशी गाडचांचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे, तर काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

गाडी क्रमांक १२११२ अमरावती ते मुंबई एक्स्प्रेस मंगळवार १९ ऑगस्ट रोजी अमरावती येथून सुटणारी नाशिक रोडपर्यंत धावेल. नाशिक ते मुंबई दरम्यान गाडी रद्द करण्यात आलीगाडी क्रमांक १२१३९ मुबई ते नागपूर सेवाग्राम एक्स्प्रेस मुंबई येथून सुटणारी १९ ऑगस्ट रोजी रद्द करण्यात आलीगाडी क्रमांक १२१४० नागपूर ते



मुंबई सेवाग्राम एक्सप्रेस नागपूर येथून सुटणारी २० ऑगस्ट रोजी रद्द करण्यात आली.गाडी क्रमांक ११००१ मुंबई ते बल्लारशाह एक्स्प्रेस मुंबई येथून सुटणारी १९ ऑगस्ट रोजी रद्द करण्यात आली.

गाडी क्रमांक ११००२ बल्लारशाह ते मुंबई एक्स्प्रेस बल्लारशाह येथून सुटणारी २१ ऑगस्ट रोजी रद्द करण्यात आली. गाडी क्रमांक १२१११ मुंबई ते अमरावती एक्स्प्रेस बुधवार २० ऑगस्ट रोजी मुंबईच्या ऐवजी नाशिक रोड येथून आपल्या नियोजित वेळेत सुटेल.

प्रवाशांच्या सोयीसाठी विविध स्थानकांवर मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत, जेथे लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वेळापत्रकांबाबत त्वरित माहिती व आवश्यक मदत प्रवाशांना उपलब्ध करून दिली जाते.यामध्ये प्रवाशांनी माहिती घेऊन प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे विभागाकडून करण्यात आले आहे.

# २०३७ पर्यंत डिजिटल व विकसित गोवा साकारण्याचा मुख्यमंत्री सावंतांचा संकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०पणजी**

गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि चेस अॅडव्हायझर्सच्या सहकार्याने 'गोवा२०३७ ची पुनर्कल्पना या संकल्पनेअंतर्गत पर्यटनक्षेत्राला शाश्वत आणि डिजिटली कनेक्टेड करण्यासाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम पणजी येथील हॉटेल विवांतामध्ये पार पडला.



या बैठकीसाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्यासह वाहतूक मंत्री मॉविन गुदिन्हो, गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या प्रतिमा धोंड, वाहतूक संचालक तसेच गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत 'विकसित भारत' हा संकल्प ठेवला आहे. मात्र, गोवा हेच उद्दिष्ट १० वर्षे आधी म्हणजे २०३७ पर्यंत पूर्ण करेल. गोवा हे देशातील एक प्रमुख पर्यटन राज्य असून दरवर्षी देश-विदेशातून लाखो पर्यटक गोव्यात येतात. ही नाळ ओळखून गोवा सरकार केवळ वाहतूक क्षेत्रातच नाही तर आता सर्वच क्षेत्रात डिजिटल होऊ इच्छित आहे.

गोवा सरकारने डिजिटल प्रणालीद्वारे आतापर्यंत गोव्यात एआय-आधारित २४० हून अधिक सेवा डिजिटल केल्या आहेत. यामुळे व्यवहारामध्ये सहजता आली असून आणखी काही सेवा डिजीटल होणार आहेत. त्यामुळेच राज्याची पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिक समृद्धीकडे वाटचाल होणार आहे. विकसीत गोव्यासाठी ९० टक्के इन्फ्रास्ट्रक्चर तयार असून याकामी राज्यातील सुमारे ७० टक्के लोक कार्यरत आहेत.

# रेतीतून सोनं, पण कारवाईतून सुटका?

## वरुड तालुक्यात रोज शंभर टिप्पर, कारवाई मात्र दोन-तीनवरच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वरुड**

वरुड तालुक्यातील रेती चोरीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. प्रशासनाच्या कारवाईच्या भीतीने काही टिप्पर चालकांनी रस्त्यावरच रेती टाकून पलायन केल्याच्या घटना समोर येत आहेत. परंतु खरा प्रश्न असा आहे की तहसीलदारांची ही कारवाई किती दिवस चालणार आणि ती कितपत परिणामकारक ठरणार?



माहितीनुसार, दररोज वरुड परिसरातून सुमारे शंभरच्या आसपास रेतीने भरलेले टिप्पर जात असतात. मात्र कारवाईच्या वेळी दोन ते तीनच टिप्पर पकडले जातात. उरलेले टिप्पर मात्र सुटकेचा श्वास घेत अवैध रेती वाहतूक सुरू ठेवतात. त्यामुळे या कारवाईचा प्रत्यक्षात किती परिणाम होत आहे याबाबत सर्वसामान्यांमध्ये संशय व्यक्त होत आहे.

गावकऱ्यांच्या मते, कारवाईचे ढोल मोठ्याने पिटले जात असले तरी रेतीमाफियांच्या आघाडीवर काही फारसा फरक पडलेला दिसत नाही. रेती चोरीतून होणारा दररोजचा लाखो रुपयांचा गैरव्यवहार काही अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाशिवाय शक्य नाही, अशी चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे.

दररोज शंभर टिप्पर सुटतात आणि फक्त दोन-तीनच पकडले जातात, मग बाकींचं काय? कारवाई खरंच कडक आहे का की केवळ दिखावा? रेती चोरीत सामील असणाऱ्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना होणार का? असे एक ना अनेक प्रश्न नागरिकांनी उपस्थित केले आहे.शासनाने जर खरंच रेतीमाफियांना आवर घालायचा असेल तर केवळ काही दिवसांची कारवाई करून भागणार नाही. सातत्यपूर्ण आणि व्यापक मोहिम राबवावी लागेल, अशी जनतेची मागणी आहे.रेतीतून सोनं कमावणाऱ्यांना थांबवण्यासाठी प्रशासन किती खंबीरपणे उभं राहतं, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल.

# पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा व स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर महाविद्यालय, अमरावती येथे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा व स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू झाली . या करिता विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह व सहभागामुळे संपूर्ण परिसरात गणेशोत्सव सुरू झाल्याची रंगत अनुभवायला मिळाली.

या कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील १०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले. विशेष म्हणजे या प्रसंगाचे औचित्य साधून नुकत्याच प्रवेशित प्रथम वर्ष आर्किटेक्चर डिप्लोमा वर्गाची सुरुवात करण्यात आली. या विद्यार्थ्यांनीही पहिल्याच दिवशी या कार्यशाळेत सहभाग घेऊन व मातीपासून गणेशमूर्ती घडवून स्वतःच्या कल्पकतेची झलक दाखवली. तसेच काही लहान मुलांनी केलेल्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार व उत्साहवर्धक ठरला.

ही कार्यशाळा दोन टप्प्यांत पार पडत असून, पहिल्या टप्प्यात मातीच्या मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. येत्या शनिवारी दुसऱ्या टप्प्यात रंगकाम होणार असून त्यानंतर सर्वोत्कृष्ट व आकर्षक मूर्तींना पारितोषिके जाहीर केली जातील.

या उपक्रमाचे मार्गदर्शन आ. पियुष डांगे (आर्किटेक्ट व फ्रीलान्स आर्टिस्ट) व सौ. प्रज्वली काळे (फ्रीलान्स शिल्पकार) यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक मातीच्या मूर्ती घडविण्याचे कौशल्य आत्मसात करून दिले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. तृप्ती भामकर व प्रा. भूपेंद्र जायसवाल यांनी यशस्वीपणे केले.

प्राचार्य प्रा. संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले तसेच कार्यशाळा घेणाऱ्या मान्यवरांचे सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले.

या यशस्वी आयोजनासाठी प्रा. सचिन हजारे, प्रा. राम विघे, प्रा. अंकुश खंडारे व प्रा. किर्ती हिंगे यांच्यासह इतर सर्व प्राध्यापकवर्ग व अशैक्षणिक कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले.या कार्यशाळेमुळे सृजनशीलता, परंपरा व शाश्वतता यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला आणि विद्यार्थ्यांसह उपस्थितांना पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी गणित विभागात प्रभावी पीपीटी कौशल्य कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २०, अमरावती**

विनायक विज्ञान महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर येथील गणितशास्त्र विभागात रविवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत एषषशलींळींश झझढ डज्ञळश्रश्री: झीशरिीळपस रपव झीशीशपींळपस झीक्षशर्लीी डशाळपरीी या विषयावर ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनंत वडतकर (आयक्यूएसी समन्वयक) होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गणितशास्त्र विभागाच्या उपक्रमाचे अभिनंदन केले.या कार्यशाळेत दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

सत्र १ : How to Design Effective PPT या विषयावर श्री. योगेश खांदरे (संगणकशास्त्र विभाग) यांनी आकर्षक पीपीटी स्लाइड्स कशा तयार कराव्यात, मजकूराचे सादरीकरण, चार्ट्स व अॅनिमेशनचा योग्य वापर तसेच टाळावयाच्या चुका यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

सत्र २ : How to Represent PPT या विषयावर गणितशास्त्र विभागाची माजी विद्यार्थिनी कु. अदीबा खान हिने प्रेझेंटेशन करताना आत्मविश्वास, देहबोली, नजरेचा संपर्क, आवाजातील स्पष्टता, वेळेचे नियोजन, प्रेक्षकांशी संवाद व प्रश्नोत्तर सत्र हाताळण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.या कार्यशाळेत एकूण ३७ विद्यार्थी सहभागी झाले. प्राचार्य डॉ. सुचिता खोडके यांनी गणितशास्त्र विभागाचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रीती देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. अभिजीत बनसोड यांनी केले.डॉ. प्रीती देशमुख व डॉ. अभिजीत बनसोड यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्या; किसान ब्रिगेड

## थिलोरी येथील शेतकऱ्यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर**

अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी थिलोरी येथील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना केली मागील सात ते आठ दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी मुळे मोठ्या अडचणी वर मात करून उभे केलेले पीक वाहून गेले आहे, तर शेतात पाणी थांबल्यामुळे पिके सुकून जात आहेत. जोरात पाऊस पडल्यामुळे शेतात मोठ मोठे खोरे पडून सुपीक माती खरडून गेली, तसेच थिलोरी शेत शिवारात असलेल्या सर्व शेत रस्त्यांना मोठ्या प्रमाणात पाणी वाहते व रस्त्याशेजारी असलेल्या शेतात पाणी घुसून पिकांचे नुकसान होते तसेच हे पाणी गावाजवळ असलेल्या लेंडी नाल्याजवळ



एकत्रित नाल्याकाठी असलेल्या शेतीचे प्रचंड नुकसान होते त्यामुळे कोणत्याही जाचक अटी न लावता तत्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना केली, तसेच मागील वर्षी एकाच गावात दोन वेगवेगळे निकष लावून थिलोरी व भाग २ मधील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई पासून वंचित ठेवण्यात आले होते त्यामुळे मंडळ चा निकष न लावता गावातील शेतीची वस्तुनिष्ठ परिस्थीत पाहून तत्काळ ५०,०००( पन्नास हजार ) रू. प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच सर्व पिकांच्या पीक विम्याची अग्रिम रक्कम आर्थिक मदत म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यात तत्काळ जमा करण्यात यावी अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली,तसेच यावेळी निवेदन देण्यात प्रामुख्याने अमित पाटील होले, किसान ब्रिगेड चे इंजी. अनिकेत वाकपांजर, प्रमोद पाटील होले, उपसरपंच गौतम वाकपांजर, अनिल पाटील होले, साहेबराव वाकपांजर, अनिल जवंजाळ, जानराव पाटील टापरे, सतीश चूडे, नंदकिशोर टापरे, निलेश होले, सुधाकर राऊत, निलेश होले तसेच मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव यावेळी उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे 'प्रतिबंधात्मक रॅगिंग दिन' साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील प्रतिबंधात्मक रॅगिंग समिती तर्फे प्रतिबंधात्मक रॅगिंग दिन अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी उत्साहात व प्रतिबद्धतेने साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेस हार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. समितीच्या सचिव डॉ. मेघा नंदनवार यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून रॅगिंगमुक्त महाविद्यालयाच्या गरजेवर भाष्य केले. समितीच्या अध्यक्षा डॉ. दीपाली विधळे यांनी यूजीसीच्या रॅगिंगविरोधी नियमांची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली तसेच नियमभंगासाठी होणाऱ्या शिक्षांबाबत व तक्रार निवारण यंत्रणेबाबत मार्गदर्शन केले. डीन सरांनी विद्यार्थ्यांना परस्पर आदर, एकता व सौहार्द जपण्याचे आवाहन केले.

सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी कोणत्याही प्रकारची रॅगिंग टाळण्याची आणि सुरक्षित, स्नेहपूर्ण वातावरण राखण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाचा समारोप डॉ. मेघा नंदनवार यांनी आभार प्रदर्शनाने केला. यावेळी मोठया संख्येने विद्यार्थी व अँटी रॅगिंग समितीचे सदस्य उपस्थित होते.

# वायगाव शेतकऱ्यांचे पिके पावसाने खरडली; शासनाकडे तातडीने नुकसान भरपाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २०, वाठोडा शुक्लेश्वर**

भातकुली तालुक्यातील आष्टी मंडळातील वायगाव येथे संतधार पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांचे तूर, कपाशी, सोयाबीन ही पिके पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. गेल्या तीन ते चार दिवसांच्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत.शेतकरी धर्मेंद्र इंगोले यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले की, शेतातील रस्त्याच्या संदर्भात वारंवार तहसील कार्यालयात तक्रार देऊनही प्रशासनाने दखल घेतली नाही. परिणामी शेतात पाणी शिरले व पिके खरडून गेली.कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी



थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली असून पंचनामा सुरू आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली होती; पण सलग तीन दिवसांच्या पावसाने सर्व पिके वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**ग्राम महसूल अधिकाऱ्यांची माहिती**

ग्राम महसूल अधिकारी रायबोले यांनी सांगितले की, पावसामुळे शेतात पाणी थांबले असून अनेक शेतकऱ्यांची पिके जडण्याच्या मार्गावर आहेत. महसूल व कृषी विभागाचे अधिकारी थेट शेतात जाऊन स्पॉट पंचनामा करत आहेत. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

# तळेगाव ठाकूरला पुराचा वेढा; गाव पाण्याखाली, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०तिवसा**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर गावावर मंगळवारी रात्री मुसळधार पावसाने अक्षरशः कहर केला. गावालगतचे नदी-नाले तुफान रौद्र रूप धारण करत गावावर धडकले. इतका प्रचंड पाऊस झाला की संरक्षणभिंतीवरून पाणी ओसंडत थेट गावात घुसलं आणि काही क्षणांतच अर्ध्याहून अधिक गाव पाण्याखाली गेले.



गावात सर्वत्र पाण्याचे लोंढे वाहू लागले. लाल चौक, तलाठी कार्यालय, अंगणवाडी, मुस्लिम बहुल भाग अशा अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरलं. अनेक घरातील धान्य, भांडीकुंडी व साहित्य वाहून गेले. गोठ्यांमधील जनावरे पाण्यात अडकली असून काहींना मोठ्या प्रयत्नांनी सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं.गावालगतची नदी भरून ओसंडली आणि कडेला असलेली शेती पूर्णपणे वाहून गेली. सोयाबीन, कापूस, मका व भाजीपाला अशी उभी पिके काही क्षणांतच पाण्याच्या प्रवाहात नष्ट झाली. शेतकऱ्यांचे वर्षभराचे श्रम पाण्यात गेल्याने गावातील शेतकरी हतबल झाले आहेत. पीककर्ज, खतं-औषधं व मजुरीसाठी केलेले खर्च सगळे वाया गेले.पूरपाण्यात गावातील वीजेचे खांब व डीपी बुडाले होते. मात्र, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वेळीच वीजपुरवठा खंडित केल्यामुळे मोठा अनर्थ टळला. अन्यथा वीजप्रवाहामुळे गावात जीवितहानीसारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली असती.प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, तसेच जनावरांसाठी चारा व निवाऱ्याची सोय करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# दर्यापूर नगरपालिका निवडणुकीत नव्या प्रभाग रचनेमुळे निवडून द्यावे लागणार २५ नगरसेवक

## नवीन हद्दवाढीमुळे नगरपरिषदेची लोकसंख्या झाली ४२८१३

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर**

दर्यापूर नगरसेवकांच्या संख्येत वाढ शाली आहे. दर्यापूर अरुणाऱ्या प्रामपंचायत गायवाही, गणेशनगर मधील काही भागाचा समावेश नगरपालिकेत करण्यात आल्याने या नवीन हद्दवाढीमुळे सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता सदस्यसंख्या निश्चित करण्यात आली असून वर्ग प्राप्त दर्यापूर नगरपालिकेत नगराध्यक्षासह २१ सदस्यांचा समावेश होता नख्या रचनेप्रमाणे नगराध्यक्षासह २६. सदस्य झाले आहे. दोन सदस्यीय ११ प्रभाग ३ सदस्यीय एक प्रभाग अशा १२ प्रभागातून २५ सदस्य निवडनद्यावे लागणार आहे, तर नगराध्यक्षाची निवड थेट जनतेतून होणार आहे. दर्यापूर नगरपालिकेचा २०११ व्या जनगणनेनुत्तार नगर पालिका क्षेत्रव नवीन हहठाढ़ क्षेत्र मिळून ४२८१३ लोकसंख्या निश्चित झाली असून ६२५० ग्रामपंचायत हद्दीतील लोकसंख्या समाविष्ट करण्यात आली आहे. क्षेत्रात दर्यापूर नगरपालिका अनुसूचित जातीची लोकसंख्या ८६१९, तर अनुसूचित जमातीची १६१४ लोकसंख्या निश्चित असल्याने दोन सदस्यीय प्रभागात २०८३ से २७६८ मतदाराचा समावेश करण्यात येणार आहे. २ सदस्यीय प्रभागात ४८२४ ते ५६५२ मतदारांचा समावेश राहणार आहे २०२५ च्या नगरपरिषट सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचनाकरण्यात आली असून प्रभाग क्र. १ मध्ये जयस्तंभ चौक, स्टेट बैंक इंडिया, नगर परिषद जुनी इमारत हा परिसर निश्चित करण्यात आला असून ३११६ मतदार राहतील प्रभाग क्र. २ मध्ये संत गाडगेबाबा महाराज मंदिर, भवानी वेश, जुनी तहसील इमारत, बुटी चौक, दर्गा मस्जीद आला आहे. मतदारांची संख्या हा परित्तर निश्चित करण्यात २४६६ राहणार आहे

मंदीर, प्रभाग क्र. ३ मध्ये निळकठेभार शांतीनगर, न.प. स्मशानभूमी, एकवीरा स्कूल ऑफ ब्रिलीयंटस आरएसके पेट्रोलपंप, तहसील कार्यालय नहीन इमारत व



सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय हा परिसर निश्चित करण्यात आला आहे. मतदारांची संख्या ३३७२ राहणार आहे. प्रभाग क्र. ४ मध्ये खोलापुरी वेश, मौलाना आजाद न. प. उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, क्रीडासंकुल हा परिसर निश्चित करण्यात आला आहे. मतदारांची संख्या ३२५६ राहणार आहे

प्रभाग क्र. ५ मध्ये उपजिल्हा स्टेशन, पंचायतसमिती नवीन रुग्णालय, न्यायालय, पोलिस इमारत ते डॉ बाबासाहेब उद्यान हा परिसर निश्चित करण्यात आला राहणार आहे. प्रभाग क्र. ६ मध्ये आहे. मतदारांची सख्या ३०९९ न. प. आठवडी न.प. गार्डन, सभ्यता स्पोर्ट क्लब बाजार, महात्मा गांधी चौक हा परिसर निश्चित करण्यात आला आहे. मतदारांची संख्या ३११५ राहणार आहे.

प्रभाग क्र. ७ मध्ये ड्रिम सिनेमा, जु. मो. लड्ढा, न.प. शाळा, ५.६.७, गुरांचा बाजार, हा परिसर निश्चित करण्यात आला आहे मतदाराची संख्या ३२५७राहणार आहे. प्रभाग क्र. ८ मध्ये विठ्ठल मंदिर, टाटा नगर बाभळी, न.प. ऊर्दू शाळा क्र. १० व ११, भूलेश्वरी मंदिर, छत्रपती नवीन हद्दवाढीमुळे ४२८१३ पालिकेची लोकसंख्या शिवाजी महाराज, न.प. मुलांची शाळा क्र. ९ सुतगिरणी हा परिसर निश्चित करण्यात आला आहे. मतदाराची संख्या ५२४७ राहणार आहे. प्रभाग क्र. ९ मध्ये छत्रपती शिवाजी ८. ईदगाह, बौध्द विहारहापरिसर महाराज न.प. मुलीची शाळा क्र. निश्चित करण्यात आला आहे.मतदारांची संख्या ३५३४ राहणार आहे.

प्रभाग क्र. १० मध्ये गावंडे जे. डी. कोकीळाबाई महाविद्यालय, सांगळुदकर महाविद्यालय, कृउबास कार्यालय, बैंक ऑफ महाराष्ट्र, आदर्श विद्यालय परिसर निश्चित करण्यात आला आहे. मतदारांची संख्या ३४१५ राहणार आहे. प्रभाग क्र. ११ मध्ये बसस्थानक, रेल्वेस्थानक, पालिका नविन इमारत, न. प. शाळा १२. प्रबोधन विद्यालय हा परिसर निश्चीत करण्यात आला आहे. मतदारांची संख्या २१७६ राहणार आहे. स्वामी पेट्रोलपप, प्रसाद मंगल प्रभाग क्र. १२ मध्ये साईनगर, कार्यालय, ड्रिमलैंड सिटी परिसर आला आहे. मतदारांची संख्या हा परिसर निश्चीत करण्यात ४६८० राहणार आहे.

# रेसलर द ग्रेट खली पोहचले मेळघाटात.......



भाजपा व युवा स्वाभिमान पार्टी द्वारा आयोजित धारणी येथील भव्य दिव्य दहिहंडी स्पर्धेत मेळघाट वासियांच्या मनोरंजनाकरिता उपस्थित झालेले थथए जागतिक दर्जाचे रेसलर द ग्रेट खली व भाजपा नेत्या व स्टार प्रचारक मा.खा.नवनित राणा तसेच मेळघाटचे आ.केवलराम काळे आ रवी राणा यांनी धारणी येथे भव्य रॅलीला सुरुवात मेळघाट वासियांद्वारे जल्लोषात झाले स्वागत.

# रेशन कार्ड धारकांसाठी महत्वाची अपडेट! कार्डवरुन नाव काढणार?

## केंद्राने पाठवली १.१७ कोटी लोकांची यादी; स्थानिक पातळीवर ब्लॉक मुख्यालयांना यादी सुपूर्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

रेशनकार्ड धारकांसाठी एक महत्वाची अपडेट आहे. केंद्र सरकारने कार्ड धारकांबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपासून पात्र नसलेल्या लाभार्थ्यांविरोधात कारवाई सुरू आहे. या लाभार्थ्यांमध्ये आयकरदाते, चारचाकी वाहनांचे मालक आणि कंपन्यांचे संचालक यांचा समावेश आहे. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने रेशनकार्डधारकांच्या तपशीलांची आयकर विभाग, रस्ते वाहतूक मंत्रालय आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यासारख्या सरकारी संस्थांच्या डेटाबेसशी जुळवून ही यादी तयार केली. यामुळे आता याचा अनेकांना फटका बसणार आहे.

९४.७१ लाख रेशनकार्डधारक करदाते आहेत, १७.५१ लाख चारचाकी वाहनांचे मालक आहेत आणि ५.३१ लाख कंपनी संचालक आहेत. एकूण १.१७ कोटी कार्डधारक अपात्र श्रेणीत येतात. आता केंद्राने राज्यांना पडताळणी करून ३० सप्टेंबरपर्यंत या अपात्र कार्डधारकांना यादीतून काढून टाकण्यास सांगितले आहे.

स्थानिक पातळीवर ब्लॉक मुख्यालयांना यादी देण्यात आली आहे. पीडीएसचा लाभ घेणारे लोक तिथून यादी घेऊन त्यांची माहिती तपासू शकतात.

अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, केंद्राने राज्यांना मदत करण्यासाठी हा डेटा शेअर केला आहे. यावरुन अपात्र लाभार्थींना काढून वेटींग यादीमध्ये समावेश असलेल्या खऱ्या गरजू लोकांना लाभ मिळेल. रेशन कार्डांची पुनरावलोकन करणे आणि अपात्र/डुप्लिकेट कार्ड काढून पात्र लाभार्थींचा समावेश करणे ही राज्यांची जबाबदारी आहे.




राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत आतापर्यंत १९.१७ कोटी रेशनकार्ड जारी करण्यात आले आहेत. देशभरात या योजनेअंतर्गत एकूण ७६.१० कोटी लाभार्थी येतात. नियमांनुसार, सरकारी कर्मचारी, १ लाख रुपये किंवा त्याहून अधिक वार्षिक उत्पन्न असलेले कुटुंबे, चारचाकी वाहन मालक आणि करदाते मोफत रेशनसाठी पात्र नाहीत.८ जुलै २०२५ रोजी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या पत्रात अन्न सचिव संजीव चोप्रा म्हणाले की, योग्य लोकांपर्यंत रेशन पोहोचवण्यासाठी ही प्रक्रिया केली जात आहे. मंत्रालयाने उइऊ्ढ, उइखउ, चउ-, चेठ्ढक आणि झच-घळीरप सारख्या अनेक एजन्सींच्या डेटाबेसमधून माहिती एकत्रित करून अपात्र लाभार्थींची माहिती मिळवली आहे.

चोप्रा म्हणाले, डेटाबेसच्या अचूकतेमुळे खऱ्या वंचित कुटुंबांना फायदा होईल आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेची पारदर्शकता सुनिश्चित होईल. हे काम ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करावे लागणार आहे.

# मंडळांच्या अडचणींवर उपाययोजना; चांदूरबाजारमध्ये शांतता समिती बैठक; पोलीस अधीक्षकाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० चांदूरबाजार**

गणेशोत्सव व आगामी सन-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर गो. सी. टोम्पे महाविद्यालयाच्या श्री. नामदेव महाराज सभागृहात चांदूरबाजार पोलिसांच्या वतीने शांतता समितीची बैठक पार पडली.



या वेळी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्पष्ट इशारा दिला की – कायदा हातात घेतल्यास पोलिसांचा दंडा तयार आहे; कोणी गालबोट लावण्याचा प्रयत्न केला तर कठोर कारवाई होईल.बैठकीत नायब तहसीलदार सोनारकर, गटविकास अधिकारी वानखडे, पोलीस निरीक्षक अशोक जाधव, शहर बांधकाम अभियंता यश अग्रवाल, विज अभियंते सूर्यवंशी व इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते.

गणेश मंडळांनी विजेचे तार, झाडांच्या फांद्या, विसर्जन स्थळावरील पथदिवे, रस्त्याची सुधारणा अशा अनेक अडचणींची माहिती दिली. श्री साई गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष करण खंडारे यांनी या मागण्या मांडल्या.यावेळी माजी नगरसेवक गोपाल तिरमारे, भाजपा नेते मुरली माकोडे व पत्रकार राजाभाऊ देशमुख यांनीही मार्गदर्शन केले.

बैठकीचे संचालन सहपोलीस निरीक्षक राठोड यांनी केले, तर आभार पोलीस उपनिरीक्षक विनोद इंगळे यांनी मानले.चांदूरबाजार शहर व तालुक्यातील नागरिक, पत्रकार, गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था

प्लास्टिक, थर्माकॉलचा वापर टाळावा. विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात येईल. पथदिव्यांचीही व्यवस्था केली जाईल.

**– गटविकास अधिकारी,**
**चांदूरबाजार पंचायत समिती**

### कायदा हातात घेऊ नका - पोलिस अधीक्षक

कायदा हातात घेऊ नका, इतर धर्मांच्या भावना दुखावू नका. सर्वांनी एकत्र उत्सव साजरा करा. गालबोट लावल्यास पोलिसांचा दंडा घेऊन आम्ही रस्त्यावर उतरणार.

**– विशाल आनंद,**
**पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण**

### मंडळांच्या समस्या सोडवल्या जातील

गणेशोत्सव दरम्यान येणाऱ्या अडचणी तातडीने सोडवण्यात येतील. मात्र, कायदा हातात घेतल्यास कठोर कारवाई केली जाईल.

**– ठाणेदार, पोलिस स्टेशन चांदूरबाजार**

# महिला सशक्तीकरणाची घोषणा कागदावरच गुलाबी ई-रिक्षा योजनेचे स्वप्न भंगले




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राज्यातील महायुती सरकारने गतवर्षी महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी गुलाबी (पिंक) ई-रिक्षा ही योजना जाहीर केली. मात्र, अद्यापपर्यंत तरी प्रत्यक्ष पात्र असलेल्या एकाही लाभार्थ्याला प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील आठ जिल्ह्यांसाठी ही योजना शासनाने सुरू केली होती. त्यासाठी १० हजार गुलाबी ई-रिक्षा वितरणाचे उद्दिष्ट महिला व बालविकास विभागाने जाहीर केले होते. त्यानुसार जिल्ह्याला ६०० इतके उद्दिष्ट मिळाले होते. यासाठी महिला व बालकल्याण विभागाकडे शहर व ग्रामीण भागातील ४०० महिलांनी रीतसर अर्ज दाखल केले आहेत; परंतु योजनेची अंमलबजावणी केली जात असली तरी वर्षभरानंतरही प्रत्यक्ष 'गुलाबी ई-पिंक रिक्षा' धावत नसल्याचे वास्तव दिसून येत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लाकडी बहीण, तीर्थक्षेत्र दर्शन, वयोश्री अशा मोठ्या संख्येने लाभार्थींचा समावेश असणाऱ्या योजनांच्या मालिकेत गुलाबी ई-रिक्षा योजना जाहीर केली होती. महिलांना स्वयंरोजगार मिळवून देणाऱ्या गुलाबी ई-रिक्षा योजनेसाठी ४०० प्रस्तावाची निवड समितीने त्याची छाननी केली. त्यातील काही प्रस्ताव पात्र ठरले आहेत. जिल्ह्यासाठी ६०० ई-रिक्षा वितरणाचे उद्दिष्टापैकी १५४ महिलांनी कागदपत्रांची पूर्तता केली आहे. यामध्ये काही लाभार्थी पात्र ठरल्या. ४२ महिलांना शिकाऊ, तर १३ जणींना कायमस्वरूपी वाहन चालविण्याचे परवाने मिळाले आहेत.

> शासनाने महिलांना स्वयंरोजगार करण्यासाठी गुलाबी पिंक ई-रिक्षा योजना सुरू केली आहे. यासाठी जिल्ह्याला ६०० एवढे उद्दिष्ट आहे. यानुसार जिल्हाभरातून सुमारे ४०० अर्ज प्राप्त आहेत. यातील पात्र असलेल्या महिलांना प्रशिक्षण दिले जात आहे. यानंतर वाहन चालविण्याचा परवाना काढावा लागतो. ही प्रक्रिया आटोपताच प्रत्यक्ष पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे.
>
> **– अतुल भडांगे, महिला व बालविकास अधिकारी.**

# पोषण आहारात गडबड? अमरावतीतील महापालिका शाळा शिक्षणाधिकाऱ्यांच्या रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मध्यान्ह भोजनातून विषबाधेच्या घटना घडू नयेत, यासाठी शासनाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित तसेच महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पोषण आहार व धान्यादी वस्तूंची तपासणी होणार असून, पुणे येथील अधिकृत प्रयोगशाळेकडे या तपासणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

१८ ऑगस्ट रोजी शिक्षणाधिकाऱ्यांचे पत्र शाळांना धडकले असून, शाळा संचालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.या योजनेअंतर्गत ईयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक व



१२ ग्रॅम प्रथिने, तर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनयुक्त भोजन देण्याची तरतूद आहे. परंतु काही ठिकाणी झालेल्या विषबाधा घटनांचा धडा घेत राज्य शासनाने १ ऑगस्टपासून मानक कार्यपद्धती (एसओपी) निश्चित केली आहे. या एसओपीचे पालन होते की नाही, हे तपासण्यासाठी शाळांमध्ये पोषण आहार व धान्य नमुन्यांची तपासणी सुरू झाली आहे.

पुणे येथील अनुष्का फूड अ‍ॅन्ड वॉटर टेस्टिंग लॅब ही संस्था शाळांमधून धान्य व तयार आहाराचे नमुने संकलित करणार असून, त्याची तपासणी प्रयोगशाळेत केली जाणार आहे. स्वयंपाकगृहाची स्वच्छता, साहित्याची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या भोजनाचा दर्जा याचीही पाहणी केली जाणार आहे.

विद्यार्थ्यांना सकस पोषण आहार मिळावा, यासाठी शिजविण्याची जबाबदारी स्थानिक महिला बचत गटांकडे सोपविण्यात आली आहे. इंधन, भाजीपाला व स्वयंपाक खर्च प्रतिविद्यार्थी गटाला स्वतंत्रपणे दिला जातो.महापालिका हद्दीतील ६३ शाळांची तपासणी होणार असून, गोदामांमधील साठाही पाहिला जाणार आहे. शाळांमध्ये पोहोचविलेले तांदूळ व इतर धान्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीशी तफावत दर्शवित असल्याच्या तक्रारी आल्याने गोदामांची झाडाझडती घेतली जाईल. त्यामुळे अनेक शाळांचे पितळ उघडे पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### शिक्षणाधिकाऱ्यांची प्रतिक्रिया

गत आठ दिवसांपासून शाळांमधील पोषण आहार व धान्य नमुन्यांचे अहवाल सादर होत आहेत. दरवर्षी नमुने घेतले जातात, मात्र यंदा शासनाने अधिकृत पुणे येथील प्रयोगशाळा नेमली असून त्यांच्या चमूचे शेड्युल्ड ठरविले आहे.

**– डॉ. प्रकाश मेश्राम,**
**शिक्षणाधिकारी, महापालिका**


# श्रावणबाळ, निराधार योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन ७-८ महिण्यांपासून रखडले

## चांदूर रेल्वेत विविध पक्षाचे पदाधिकारी धडकले तहसिल कार्यालयावर : २५ ऑगस्टला तहसिलदारांच्या दालनात लाभार्थ्यांसह बैठा सत्याग्रह आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील अनेक लाभार्थी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व अपंग व्यक्तींना योजनेचे गेल्या ७-८ महिन्यांपासून मासिक मानधन खात्यावर जमा झालेले नाही. त्यामुळे आम आदमी पक्ष, शिवसेना (ठाकरे गट), भारतीय कम्युनिष्ट पक्ष, जनता दल (से.), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षाचे पदाधिकारी आप नेते तथा माजी न.प. उपाध्यक्ष नितीन गवळी यांच्या नेतृत्वात मंगळवारी (ता. १९) स्थानिक तहसिल कार्यालयावर धडकले होते. यावेळी त्यांनी आक्रमक भुमिका घेत या आठवड्यात लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे मानधन न मिळाल्यास २५ ऑगस्टला तहसिलदार यांच्या थेट दालनात लाभार्थ्यांसह बैठा सत्याग्रह आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.

चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील अनेक लाभार्थी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व अपंग व्यक्तींसाठीची मासिक मानधन योजना अंतर्गत नोंदणीकृत आहेत. मात्र, गेल्या ७-८ महिन्यांपासून या योजनेचे मासिक मानधन अनेक लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झालेले नाही. यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या आर्थिक



अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दैनंदिन खर्च, औषधोपचार व घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण झाले आहे. काही लाभार्थ्यांचा आधार कार्ड सिडींग संबंधित त्रुटी असता त्यांनी ती त्रुटी बँकेत जाऊन सोडविली. मात्र त्यानंतरही काही लाभार्थ्यांचे मागील मानधन अद्याप बँक खात्यात जमा झालेले नाही. त्यामुळे या विषयात लक्ष घालून संबंधित विभागाशी पाठपुरावा करून गोरगरिब लाभार्थ्यांचे थकीत मानधन तातडीने मंजूर करून द्यावे अशी मागणी तहसिलदार पुजा माटोळे यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी नितीन गवळी, बंडूभाऊ यादव, गजानन यादव, कॉ. सतिष चौधरी, प्रभाकर भगत, मेहमुद हुसैन, कॉ. रामदास कारमोरे, प्रा. प्रसेन्नजित तेलंग, राजाभाऊ भैसे, भुषण नाचवणकर, महादेवराव शेंद्रे, विनोद लहाणे, संजय डगवार, कमलकिशोर पनपालीया, अशोक सोमकुंवर, अंबादास हरणे, शेखर बद्रे यांसह अनेकांची उपस्थिती होती.

### तक्रारी सोडविण्याकरिता एक वेगळा कक्ष तयार करावा

याविषयी काही लाभार्थी तहसिल कार्यालयात मानधन न आल्यामुळे गेले असता संबंधितांकडून योग्य मार्गदर्शन दिल्या जात नसल्याचीही तक्रार आमच्याकडे आल्याचे सदर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनात नमुद केले आहे. त्यामुळे याबाबतच्या तक्रारी सोडविण्याकरिता एक वेगळा कक्ष तयार करून लाभार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात यावे अशीही मागणी तहसिलदारांकडे करण्यात आली आहे.